दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ८ वे I पाने ८ I मुल्य रू. ५.०० I अंक २ I रविवार ११ ऑक्टोबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## कुटुंबावर २०० जणांच्या जमावाचा हल्ला

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरच्या राहुरीमध्ये जमिनीच्या वादातून एका कुटुंबावर तब्बल १५० ते २०० जणांच्या जमावाने हल्ला केल्याचा गंभीर प्रकार समोर आलाय. या हल्ल्यात कुटुंबातील सदस्य जखमी झाले असून, न्यायाच्या अपेक्षेने हे कुटुंब जखमी अवस्थेतच थेट पोलीस अधीक्षक कार्यालयात पोहोचले. एसपींनी तातडीने उपचाराच्या सूचना देत संबंधित प्रकरणात कारवाईचे निर्देश दिले. मात्र, जमिनीच्या वादातून एवढ्या मोठ्या जमावाने हल्ला केल्याच्या आरोपामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

राहुरी येथे जागेच्या वादातून जमिनीवर ताबा घेण्याच्या प्रयत्नात एका कुटुंबावर १५० ते २०० जणांच्या जमावाने अचानक हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात कुटुंबातील काही सदस्य जखमी झाले. त्यानंतर जखमी अवस्थेतच कुटुंबीयांनी अहिल्यानगर येथील पोलीस अधीक्षक कार्यालय गाठत आपली व्यथा मांडली.

# ग्रामीण महाराष्ट्रातून दिल्लीच्या दरबारात ‘राष्ट्र सह्याद्री’चा डंका!

## सातव्या वर्धापनदिनी राजधानीत कर्तृत्वाचा गौरव; करण नवले यांच्या जिद्द, चिकाटीला मान्यवरांची दाद

- विखे पाटील यांच्यासह रामदास आठवले, विजय वडेट्टीवारांकडून माध्यम समूहाच्या वाटचालीचे कौतुक
- यशवंतराव गडाख यांच्यासह २२ मान्यवरांना ‘सह्याद्री रत्न’ पुरस्कार प्रदान





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** ग्रामीण महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातून सुरू झालेल्या दैनिक राष्ट्र सह्याद्रीने अवघ्या सात वर्षांत राजधानी दिल्लीपर्यंत घेतलेली झेप ही मराठी पत्रकारितेसाठी अभिमानाची बाब आहे. प्रचंड व्यावसायिक स्पर्धेच्या काळात जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनतीच्या बळावर दैनिक राष्ट्र सह्याद्रीने निर्माण केलेली स्वतंत्र ओळख कौतुकास्पद आहे, अशा शब्दांत राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संपादक करण नवले यांच्या कार्याचा गौरव केला. दैनिकाच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात आयोजित मराठी मेळावा आणि ‘सह्याद्री रत्न पुरस्कार सोहळ्या’त विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि पत्रकारितेच्या सामर्थ्याची राजधानीत प्रभावी छाप उमटवली. महाराष्ट्र सदनातील या दिमाखदार सोहळ्याला केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, भाजपचे नेते श्याम जाजू, सुदर्शन वृत्तवाहिनीचे प्रमुख धर्मवीर सुरेश चव्हाणके, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील, तेलंगणा चित्रपट महासंघाचे अध्यक्ष रामाकृष्णा, लंडनचे उद्योजक नीक जोन्स, महाराष्ट्राचे दिल्लीतील माहिती संचालक हेमराज बागुल, महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोळपते, ज्येष्ठ संपादिका शीला पेंढारकर, उद्योजक राम पेंढारकर आदी मान्यवर उपस्थित होते.

> अहिल्यानगरच्या मातीत रुजलेले वृत्तपत्र, महाराष्ट्रात विस्तारलेला वाचकवर्ग आणि आता राजधानीत उमटलेली ठळक छाप... दैनिक राष्ट्र सह्याद्रीचा सातवा वर्धापनदिन हा केवळ एका वृत्तपत्राचा उत्सव ठरला नाही, तर मराठी पत्रकारितेच्या महत्त्वाकांक्षी वाटचालीचा गौरवसोहळा ठरला!

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, की विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा देशाच्या राजधानीत **(पान ४ वर)**

### सह्याद्री रत्न पुरस्कारांचे मानकरी

- यशवंतराव गडाख : सह्याद्री रत्न
- डॉ. सुष्मिता विखे पाटील : सह्याद्री शिक्षणरत्न
- वासुदेव दिगंबर काळे : सह्याद्री सहकाररत्न
- नित्यानंद येवले : सह्याद्री उद्योगरत्न
- जगद्गुरु महंत अरुणनाथगिरीजी महाराज : सह्याद्री धर्मरत्न
- भाऊसाहेब चौधरी : सह्याद्री सेवारत्न
- रणजीत देशमुख : सह्याद्री कृषीउद्योग रत्न
- प्रदीप चव्हाण : सह्याद्री ग्रामरत्न (आदर्श सरपंच)
- यशवंत डांगे : सह्याद्री प्रशासन रत्न
- डॉ. दिव्या चंदना : सह्याद्री आरोग्यरत्न
- स्व. साहेबराव घाडगे पाटील : सह्याद्री शिक्षणरत्न
- रणजीत बनकर : सह्याद्री उद्योगरत्न (बांधकाम)
- राहुल जांभळकर : सह्याद्री व्यापाररत्न ( इम्पोर्ट-एक्स्पोर्ट)
- राहुल अमृत रसाळ : सह्याद्री कृषीरत्न
- यमाजी मालकर : सह्याद्री वृत्तरत्न (ज्येष्ठ पत्रकार स्व. अशोक तुपे यांच्या स्मरणार्थ)
- भाऊसाहेब टावरे : सह्याद्री उद्योगरत्न
- ॲड. अरुण लोंगाणी : सह्याद्री कायदेरत्न
- सौ. पारुल सिंग : सह्याद्री क्रीडारत्न
- राम राहुल चिंबळकर : सह्याद्री उद्योगरत्न
- अमोल विठ्ठल बेंगडे : सह्याद्री उद्योगरत्न
- जयराज दंडवते : सह्याद्री शिक्षणरत्न
- ग्लोरी चौहान-ससाणे : सह्याद्री सेवारत्न

## संदीप थोरात मृत्यूने ठेवीदारांच्या पैशांचा प्रश्न ऐरणीवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**अहिल्यानगर :** सह्याद्री मल्टिस्टेटचे संस्थापक संदीप थोरात यांचा ९ ऑक्टोबर रोजी नाशिकच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. ठेवीदारांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात गेल्या चार महिन्यांपासून ते नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात न्यायालयीन कोठडीत होते. त्यांच्या मृत्यूमुळे या प्रकरणातील ठेवीदारांच्या पैशांच्या परताव्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

थोरात यांना दम्याचा त्रास होता. प्रकृती बिघडल्याने तीन दिवसांपूर्वी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना त्यांची प्रकृती खालावली आणि त्यांचा मृत्यू झाला.गुंतवणूकदारांना शेअर बाजारासह विविध व्यवसायांत पैसे गुंतवून दरमहा १५ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांच्या ठेवी जमा केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. पैसे मागण्यासाठी गेलेल्या ठेवीदारांची टाळाटाळ केल्याच्याही तक्रारी होत्या. या प्रकरणाचा तपास अहिल्यानगर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू होता.

थोरात यांच्या मृत्यूमुळे ठेवीदारांचे दावे संपुष्टात येत नाहीत. मात्र, त्यांच्या ठेवींची वसुली, संबंधित मालमत्तांचा शोध, जप्ती आणि कायदेशीर प्रक्रियेद्वारे रक्कम परत मिळवण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. तपास यंत्रणांनी ठेवीदारांच्या तक्रारींचा पाठपुरावा करून उपलब्ध मालमत्ता व आर्थिक व्यवहारांची माहिती संकलित करणे आवश्यक आहे. ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी प्रशासन आणि संबंधित यंत्रणा काय पावले उचलतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तीन माजी मुख्यमंत्र्यांसह चार हजार जण ताब्यात

**दिपके, ध्रुव राठी, ममता बॅनर्जींचा समावेश**
**ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठीचे आंदोलन**
**दिल्लीत अभूतपूर्व नाकेबंदी, आंदोलन रोखण्यासाठी हजारो पोलिसांचा फौजफाटा!**

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून राजधानी दिल्लीतील राजकीय वातावरण तापल्याचा दावा करण्यात येत आहे. मतदार याद्या आणि विशेष सखोल मतदार पडताळणी प्रक्रियेतील (एसआयआर) कथित अनियमिततांविरोधात सीजेपीने पुकारलेल्या ‘चलो जंतर-मंतर’ आंदोलनाला रोखण्यासाठी दिल्ली पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात केल्याची माहिती समोर आली आहे. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या २२१ कंपन्या आणि दिल्ली पोलिसांचे सुमारे १५ हजार कर्मचारी, असा एकूण ३८ हजारांच्या आसपासचा फौजफाटा तैनात करण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, एवढ्या मोठ्या बंदोबस्तानंतरही तरुण, विद्यार्थी, वकील आणि विविध सामाजिक संघटनांमध्ये आंदोलनाविषयी उत्सुकता आणि असंतोष असल्याचे चित्र आंदोलनाच्या समर्थकांकडून मांडले जात आहे.

जंतर-मंतरकडे जाणाऱ्या मार्गांवर अनेक थरांचे बॅरिकेड्स, विविध सीमांवर तपासणी आणि गर्दी नियंत्रित करण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आल्याचे वृत्त आहे. आंदोलनासाठी दिल्लीकडे येणाऱ्या नागरिकांची वाहतूक रोखण्यापासून ते गर्दीचे व्यवस्थापन करण्यापर्यंत विविध उपाययोजना करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.



त्यामुळे आंदोलनाचे नियोजन आणि पोलिसांची प्रतिबंधात्मक रणनीती यावरून नवा राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

**चार हजार जणांना ताब्यात घेतल्याचा दावा; राजकीय वर्तुळात खळबळ**

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सुमारे चार हजार जणांना ताब्यात घेण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, पिनारायी विजयन आणि अरविंद केजरीवाल यांच्यासह सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके, ध्रुव राठी, नेहा बोरा आणि योगेंद्र यादव यांची नावेही ताब्यात घेतलेल्या व्यक्तींमध्ये असल्याचे वृत्तात म्हटले आहे. मात्र, या सर्वांच्या ताब्यातील स्थितीची आणि एकूण संख्येची स्वतंत्र अधिकृत पुष्टी आवश्यक आहे.




विमानतळावर सीजेपीशी संबंधित अभिजित दीपके, सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना ताब्यात घेतल्याचा दावाही करण्यात आला आहे. आंदोलनाची जबाबदारी अजिंक्य शिंदे यांच्याकडे सोपविण्यात आल्याचे दीपके यांनी म्हटल्याचे सांगितले जाते. त्यानंतर त्यांच्याशी संपर्क होत नसल्याचा दावाही पुढे आला आहे. या घडामोडींमुळे आंदोलनाच्या नेतृत्वाबाबत आणि पुढील रणनीतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

**३८ हजारांच्या आसपासच्या बंदोबस्ताची चर्चा; रेल्वे, मेट्रो आणि सीमांवर लक्ष**

आंदोलनाच्या दिवशी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन राजधानीत व्यापक सुरक्षा नियोजन करण्यात आल्याचे सांगितले जाते. ८ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या २२१ कंपन्या, **(पान ४ वर)**

## जमिनींचा अध्यादेश निघेपर्यंत उद्योगांना पाय ठेवू देणार नाही

### सारंग लखानी यांच्या कंपनीला १२०० एकर जमीन देण्याच्या निर्णयाने शेतकरी आक्रमक;आजपासून मोजणी व वेड्या बाभळी काढण्याचे काम रोखणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अकारी पडीत शेतकऱ्यांचा पून्हा एल्गार!**

**माळवाडगाव :** शेती महामंडळाच्या हरिगाव मळ्यातील नऊ गावांतील अकारी पडीत जमिनी मूळ वारस शेतकऱ्यांना परत मिळाव्यात, यासाठी सुरू असलेल्या संघर्षाला आता निर्णायक वळण मिळण्याची चिन्हे आहेत. उद्योगांसाठी हजारो एकर जमिनी देण्याचे शासन निर्णय वेगाने होत असताना, मूळ जमीनमालक शेतकऱ्यांच्या जमिनी वाटपाचा अध्यादेश अद्याप निघत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी वाटपाचा अध्यादेश जारी होईपर्यंत हरिगाव मळ्याच्या हद्दीत कोणत्याही उद्योगाला पाय ठेवू देणार नाही, असा ठाम इशारा ॲड. अजित काळे यांनी दिला आहे.

सारंग लखानी यांच्या कंपनीला ४९ वर्षांच्या कराराने १२०० एकर जमीन देण्याचा शासन निर्णय ५ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाल्यानंतर अकारी पडीत शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली. यापूर्वी निबे ग्रुपला १५०० एकर जमीन देण्याचा निर्णय झाल्याचा संदर्भ देत, उद्योगांसाठी जमीन उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया वेगाने होत असताना शेतकऱ्यांच्या जमिनींच्या प्रश्नाला विलंब का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी, १० ऑक्टोबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सभागृहात नऊ गावांतील शेतकऱ्यांची बैठक झाली.



ॲड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली हरिगाव मळ्यातील नऊ गावांतील शेतकऱ्यांची निर्णायक लढ्याच्या तयारीसाठी बैठक संपन्न झाली.

ॲड. काळे म्हणाले की, २०२३ पासून अकारी पडीत जमिनी परत मिळविण्यासाठी संघर्ष सुरू आहे. न्यायालयीन निकालानंतर २०२४ मध्ये मंत्रिमंडळ स्तरावर निर्णय झाला. त्यानंतर कायद्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव राज्यपालांकडे पाठविण्यात आला. मात्र, पुढील कार्यवाही न झाल्याने शेतकऱ्यांना पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला. महात्मा गांधी पुतळ्यासमोर आत्मक्लेश आंदोलन, श्रीरामपूर पोलीस ठाण्यासमोर चक्का जाम आणि शेती महामंडळाच्या कार्यालयासमोर अन्नत्याग उपोषण अशी आंदोलने करण्यात आली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मध्यस्थीने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत बैठक झाली. त्यानंतर १५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत अकारी पडीत जमिनी मूळ वारसांना परत देण्यासंदर्भातील कायद्यातील सुधारणेला मान्यता देण्यात आल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. संबंधित प्रस्ताव राज्यपालांकडे पाठविण्यात आल्याचेही त्यांना सांगण्यात आले होते.

निबे ग्रुपच्या भूमिपूजन कार्यक्रमाला शेतकऱ्यांनी सहकार्य केले होते. त्या वेळी कंपनीचे बांधकाम सुरू होण्यापूर्वी अकारी पडीत शेतकऱ्यांच्या जमीनवाटपाची प्रक्रिया सुरू होईल, असे आश्वासन मिळाल्याचे बैठकीत सांगण्यात आले. मात्र, ५ **(पान ४ वर)**

## वाळू तस्करांच्या हल्ल्यात दोन वनरक्षक जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता:** कोळगावथडी (ता.कोपरगाव) येथील गोदावरी नदीपात्रातून, वनविभागाच्या राखीव वनामधून होणाऱ्या अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या वन विभागाच्या फिरत्या पथकावर वाळू माफियांनी केलेल्या प्राणघातक हल्ल्यात वनविभागाचे दोन कर्मचारी गंभीर जखमी झाले.

**४० जणांच्या जमावावर गुन्हा ; आठ जणांना अटक**

याबाबत ३५ ते ४० जणांवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. यातील ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या आरोपींना आज, शनिवारी कोपरगाव येथील न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

दिपक चंद्रभान मोरे, (वय ३२) आकाश नंदकिशोर निंबाळकर (वय २९), देवराम वाल्मीक कोळपे, (वय ३९), वसिम मोहम्मद शेख, (वय ३०), कृष्णा जनार्दन काळे, (वय ३५, सर्व रा. कोळगाव थडी, कोपरगाव), प्रतीक मोहन कोळपे (वय २४), जालींदर भागवत पांढरे, वय ३८), राहुल रविंद्र निकाळे (वय २८, सर्व रा. कोळपेवाडी, कोपरगाव) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

सचिन लहानु शिंदे (वय ४७, वनपाल) व सुरेश नवनाथ भोसले (वय ३७, वनरक्षक, दोघेही रा. अहिल्यानगर) हे दोन कर्मचारी जखमी झाले. वनपरिक्षेत्र अधिकारी दादासाहेब **(पान ४ वर)**

# नाना : अभिनयाचा अमिट ठसा !

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

खर्जातील आवाज, संवादांतील अंगार, देहबोलीतील आक्रमकता आणि सामाजिक जाणिवांची धग अभिनयाच्या पारंपरिक चौकटी मोडणाऱ्या नाना पाटेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध.भारतीय चित्रपटसृष्टीत अनेक अभिनेते आले, अनेकांनी लोकप्रियतेची शिखरे गाठली; परंतु काही कलावंत असे असतात, की त्यांची ओळख केवळ पडद्यावरील भूमिकांपुरती मर्यादित राहत नाही. त्यांचा आवाज, त्यांची देहबोली, त्यांचे विचार आणि त्यांची जगण्याची पद्धत यांतून एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आकाराला येते. नाना पाटेकर हे अशाच मोजक्या कलावंतांपैकी एक. त्यांच्या अभिनयातील रांगडेपणा, संवादफेकीतील विलक्षण ताकद आणि अंतर्मनातील भावनांचा ज्वालामुखी प्रेक्षकांना कायम अस्वस्थ करत राहिला. नानांचा अभिनय पाहताना पडद्यावर केवळ एखादे पात्र दिसत नसे, तर त्या पात्राच्या मनातील संघर्षही जिवंत होत असे.

नानांचे मोठेपण त्यांच्या लोकप्रियतेत नव्हते, तर त्यांनी लोकप्रियतेची व्याख्याच बदलून टाकली, यात होते. पारंपरिक नायकाच्या देखणेपणाच्या चौकटीत न बसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने केवळ अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. त्यांनी सिद्ध केले की, नायक होण्यासाठी आकर्षक चेहरा नव्हे, तर व्यक्तिरेखेत प्राण फुंकण्याची क्षमता आवश्यक असते. रंगभूमीपासून सुरू झालेला नानांचा प्रवास संघर्ष, प्रयोगशीलता आणि प्रतिभेचा प्रवास होता. 'घोटभर पाणी', 'तन माजोरी', 'हमीदाबाईची कोठी' आणि 'पुरुष' यांसारख्या नाटकांतून त्यांनी आपल्या अभिनयाची ताकद सिद्ध केली. विशेषतः 'पुरुष'मधील गुलाबराव या व्यक्तिरेखेतून त्यांनी सत्तेचा उन्माद, पुरुषी वर्चस्व आणि माणसाच्या विकृत मानसिकतेचे अस्वस्थ करणारे दर्शन घडवले.

नानांचा अभिनय केवळ संवादांवर अवलंबून नव्हता. डोळ्यांतील संताप, चेहऱ्यावरील ताण, शरीराची हालचाल आणि आवाजातील चढ-उतार यांच्या माध्यमातून ते प्रेक्षकांशी संवाद साधत. त्यांच्या आवाजात एक वेगळीच धार होती. संवाद संपल्यानंतरही त्याचा परिणाम प्रेक्षकांच्या मनात बराच काळ घुमत राहायचा. अभिनयाच्या व्याकरणाला स्वतःच्या शैलीची जोड देत त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली.

'परिंदा', 'क्रांतिवीर', 'प्रहार', 'अग्निसाक्षी', 'खामोशी' आणि 'अब तक छप्पन' यांस... चित्रपटांतून त्यांच्या अभिनयाचे विवि... पैलू समोर आले. 'क्रांतिवीर'मधील ... अन्यायाविरुद्धचा संताप असो किंवा ... 'प्रहार'मधील लष्करी शिस्त आणि ... देशनिष्ठा, नानांनी प्रत्येक भूमिकेला वेगळी ... उंची दिली. 'खामोशी'सारख्या चित्रपटात ... संवादांपेक्षा भावनांच्या अभिव्यक्तीला ... महत्त्व देत त्यांनी आपली अभिनयक्षमता वे... पद्धतीने सिद्ध केली. त्यांच्या भूमिकांमध्ये आक्रमकता होती; पण ती केवळ आरडाओरड नव्हती. त्या आक्रमकतेमागे वेदना, असहाय्यता, अन्यायाविरुद्धचा संताप आणि व्यवस्थेविषयीची चीड दडलेली असे. म्हणूनच त्यांचा अभिनय प्रेक्षकांचे केवळ मनोरंजन करत नसे, तर त्यांना विचार करायलाही भाग पाडत असे.

नाना पाटेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची सामाजिक बांधिलकी. दुष्काळ, शेतकऱ्यांच्या समस्या आणि ग्रामीण भागातील आर्थिक संकटे यांविषयी त्यांनी सातत्याने भूमिका मांडली. मकरंद अनासपुरे यांच्या सहकार्याने त्यांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांत मदतकार्य उभे केले. संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत मिळावी, विधवांना आधार मिळावा आणि ग्रामीण भागातील लोकांना पुन्हा उभे राहण्याची संधी मिळावी, यासाठी त्यांनी योगदान दिले.

कलाकाराचे सामाजिक कार्य अनेकदा प्रसिद्धीच्या झगमगाटात हरवते. मात्र, नानांच्या बाबतीत त्यांच्या अभिनयाइतकीच त्यांच्या सामाजिक कार्याची चर्चाही महत्त्वाची ठरली. शेतकऱ्यांचे प्रश्न हे केवळ बातम्यांचे विषय नसून समाजाच्या जगण्याशी निगडित वास्तव आहे, याची जाणीव करून देण्यात त्यांच्या कार्याचा वाटा राहिला.

खरा कलाकार समाजापासून वेगळा असू ... नाही. समाजातील वेदना त्याला अस्वस्थ ...तात आणि त्या अस्वस्थतेतून त्याची ...कलाही आकार घेते. नानांच्या बाबतीत ...हा संबंध अनेकदा प्रकर्षाने जाणवला. ... पडद्यावर अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारा ... अभिनेता प्रत्यक्ष आयुष्यातही सामाजिक ... प्रश्नांकडे पाठ फिरवत नव्हता, ही त्यांच्या ...यक्तिमत्त्वाची महत्त्वाची बाजू होती.

...नाना पाटेकर यांच्याकडे पाहताना त्यांच्या गुणांचे कौतुक करणे जितके आवश्यक आहे, तितकेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुंतागुंत समजून घेणेही महत्त्वाचे आहे. ते स्पष्टवक्ते होते. त्यांची बोलण्याची पद्धत अनेकदा थेट आणि परखड असे. त्यांचे विचार सर्वांनाच पटतील असे नव्हते; परंतु स्वतःची स्वतंत्र ओळख जपणाऱ्या कलाकारांमध्ये त्यांचे स्थान निश्चितच वेगळे होते. काळ बदलला, चित्रपटसृष्टीची भाषा बदलली, अभिनयाच्या शैली बदलल्या; तरी नानांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची स्वतंत्र मुद्रा जपली. हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी मराठी कलाकार म्हणून आपली ओळख कमी होऊ दिली नाही. त्यांच्या हिंदी संवादफेकीत मराठी वळणाची छटा होती; पण त्याच छटेला त्यांनी सामर्थ्य बनवले. अभिनयासाठी परकीय शैलीचे अंधानुकरण करण्यापेक्षा स्वतःची वैशिष्ट्ये जपणे किती महत्त्वाचे असते, हे त्यांनी दाखवून दिले.

कलाकाराचे यश केवळ पुरस्कार, लोकप्रियता किंवा चित्रपटांच्या व्यावसायिक यशावर मोजता येत नाही. त्याने प्रेक्षकांच्या मनावर किती खोल ठसा उमटवला, किती पिढ्यांना प्रभावित केले आणि समाजाच्या प्रश्नांशी किती नाते जोडले, यावरही त्याचे मोठेपण ठरते. या निकषांवर नाना पाटेकर यांचा कलाप्रवास अभ्यासण्यासारखा आहे.

नानांच्या कारकिर्दीचा विचार करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा त्यांच्या अभिनयामुळे स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करत. त्यांच्या संवादांतील आक्रमकता, अन्यायाविरुद्धचा उद्रेक आणि व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची वृत्ती यामुळे अनेक भूमिका लोकांच्या स्मरणात राहिल्या.

काळाच्या ओघात चित्रपट विस्मरणात जाऊ शकतात, नव्या पिढीचे नायक बदलू शकतात आणि मनोरंजनाची माध्यमेही बदलू शकतात; परंतु काही कलाकारांच्या कामातील प्रामाणिकपणा कालबाह्य होत नाही. नाना पाटेकर यांचा अभिनय याच श्रेणीत मोडतो.

कलाकाराचे शरीर काळाच्या अधीन असते; पण त्याची कला काळाच्या सीमा ओलांडू शकते. नाना पाटेकर यांच्या अभिनयाचा वारसा पुढील पिढ्यांतील कलाकारांना अभिनयाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देत राहील. कारण काही आवाज केवळ कानांवर आदळत नाहीत, तर मनात घर करतात. काही भूमिका केवळ पडद्यावर उभ्या राहत नाहीत, तर समाजाच्या स्मृतीत कोरल्या जातात. नाना पाटेकर हे केवळ अभिनेता नाहीत, तर अभिनयातील अस्वस्थतेचे, सामाजिक जाणिवेचे आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक आहेत. त्यांच्या खर्जातील आवाजाचा प्रभाव, संवादांमधील अंगार आणि सामाजिक कार्यातून व्यक्त झालेली माणुसकी हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे संचित आहे. नाना नावाचा हा अभिनयातील ज्वालामुखी त्यांच्या कलाकृतींतून आणि सामाजिक योगदानातून दीर्घकाळ धगधगत राहील.

## घुमनदेव गावचे तळे तुडुंब भरले; पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील घुमनदेव गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला असून गावचे तळे पूर्ण क्षमतेने भरून देण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे.

घुमनदेव ग्रामपंचायतीवर प्रशासकीय कार्यभार असताना गावात दोन ते तीन दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत होता. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. ही समस्या भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दीपक पटारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गिरीधर आसने आणि भाजपचे तालुका सरचिटणीस भैरव कांगुणे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर विखे पाटील



यांनी संबंधित कार्यकारी अभियंत्यांना घुमनदेवचे तळे भरून देण्याच्या सूचना केल्या.या कामासाठी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्नील काळे, कलापुरे आणि पाटकरी योगेश घोगरे यांनी सहकार्य केले. गावातील रस्ते, पाणी आणि वीज या प्रश्नांसाठीही भैरव कांगुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.पाणीप्रश्न मार्गी लागल्याने माजी उपसरपंच रणजित बोडखे यांच्यासह कयूम सय्यद, शेखर कांगुणे, रमेश कांगुणे, शिवाजी शिरसाठ, राजू मते, आबासाहेब मते, सोपान मते, अरविंद पटारे आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत संबंधितांचे आभार मानले.

## नॅशनल आयडॉल शिक्षक पुरस्काराबद्दल विष्णू पोटे यांचा सन्मान




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथील श्री सिद्धेश्वर इंग्लिश स्कूलमध्ये कार्यरत असलेले शिक्षक विष्णू पोटे सर यांना द चेंज फाउंडेशन तर्फे दिला जाणारा राष्ट्रीय आयडॉल शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा माजी सरपंच सुनील बाकलीवाल व ग्रामस्थांच्या हस्ते सत्कार करून सन्मान करण्यात आला

श्री पोटे सर यांनी आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, नेतृत्व गुण आणि विद्यार्थी केंद्रित दृष्टिकोन याच्या बळावर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या मुळे हा पुरस्कार प्राप्त झाला. त्यांच्या हया यशाबद्दल विधान परिषद सदस्य आमदार किशोरराव दराडे, आमदार विठ्ठलराव लंघे साहेब यांनी अभिनंदन केले

प्रवरासंगम येथे झालेल्या कार्यक्रम प्रसंगी ग्रामस्थांच्या वतीने माजी सरपंच सुनील बाकलीवाल, उपसरपंच नितीन भालेराव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.पुढील काळात विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावून संस्कारक्षम विद्यार्थी घडवून शाळेचे व गावचे नाव लौकिक करण्यासाठी विष्णू पोटे निश्चितच प्रयत्न करतील अशा पुढील यशस्वी वाटचाली करता शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड सर,पर्यवेक्षक सरोदे आणि सर्व शिक्षक वृंद ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते सूत्रसंचालन पडताळे यांनी केले

## शनिशिंगणापुरात शनिअमावस्या यात्रा उत्साहात ,चार लाख भाविकांनी घेतले शनिदर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे शनैश्चर अमावस्येनिमित्त आयोजित यात्रा उत्साहात संपन्न झाली. यावेळी सुमारे चार लाख भाविकांनी शनिदेवाचे दर्शन घेतले. दुष्काळी परिस्थिती आणि तीव्र उन्हामुळे यंदा भाविकांच्या गर्दीत घट झाल्याचे चित्र दिसून आले. मात्र, देवस्थान प्रशासनाने दर्शन, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा आणि वाहनतळाचे नियोजन केल्याने भाविकांना दिलासा मिळाला.

शनिवारी मध्यरात्रीपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. उन्हाचा त्रास कमी करण्यासाठी दर्शनमार्गावर गार पाण्याचे तुषार फवारण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच मुख्य दर्शनमार्ग, रस्ते आणि वाहनतळांवर मंडप उभारण्यात आले होते. ठिकठिकाणी पिण्याचे पाणी आणि प्राथमिक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.



**पोलिसांचा चोख बंदोबस्त**

जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमुक्का यांच्या मार्गदर्शनाखाली तीन उपविभागीय पोलीस अधिकारी, १८ पोलीस उपनिरीक्षक, आठ पोलीस निरीक्षक आणि ३२३ पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, रियाज शेख आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिस्थितीवर लक्ष ठेवले. शनिशिंगणापूरचे पोलीस निरीक्षक दीपक धनवटे व सोनईचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांनी बंदोबस्ताचे नियोजन केले.

**दुष्काळ आणि उन्हामुळे गर्दीत घट**

दरवर्षी शनैश्चर अमावस्येला लाखो भाविक शनिशिंगणापूर येथे दर्शनासाठी येतात. यंदा दुष्काळी परिस्थिती आणि तीव्र उष्णतेमुळे भाविकांची उपस्थिती तुलनेने कमी असल्याचे जाणवले. तरीही सुमारे चार लाख भाविकांनी शनिदर्शन घेतले.

**मान्यवरांच्या हस्ते आरती**

मध्यरात्रीच्या आरतीचा मान सौरभ बत्रा आणि रेमंत मारवा यांना, सकाळच्या आरतीचा मान माजी खासदार चंद्रकांत खैरे यांना, तर दुपारच्या आरतीचा मान राहुल गोडसे आणि जयेश शहा यांना मिळाला. सायंकाळची आरती आमदार विठ्ठलराव लंघे आणि आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते झाली. यावेळी न्यायमूर्ती शिवाजी कचरे, राजस्थानचे राज्यमंत्री के. के. बिष्णोई, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, पद्मश्री पोपटराव पवार, आमदार नारायण कुचे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

**तीन दिशांनी येणाऱ्या वाहनांसाठी स्वतंत्र व्यवस्था**

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी घोडेगाव, संभाजीनगर आणि शिर्डी मार्गाने येणाऱ्या भाविकांसाठी स्वतंत्र वाहनतळ उभारण्यात आले होते. देवस्थानचे कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांच्या मार्गदर्शनाखाली दर्शनव्यवस्था आणि भाविकांच्या सुविधांचे नियोजन करण्यात आले. महसूल व पोलीस यंत्रणेने समन्वयाने काम केल्याने यात्रा व्यवस्थापन सुरळीत पार पडले.

## वृद्धाश्रमातील ज्येष्ठांच्या आशीर्वादात साजरा केला वाढदिवस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** वाढदिवसाचा आनंद केवळ मित्रपरिवारासोबत साजरा न करता गरजूंच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याच्या उद्देशाने प्रथमेश जोशी यांनी यंदाही आपला वाढदिवस श्रीरामपूर येथील माऊली वृद्धाश्रमात साजरा केला. यावेळी त्यांनी मित्रपरिवारासह वृद्धाश्रमातील चिमुकल्यांसोबत आनंदाचे क्षण घालवले, तर ज्येष्ठांचे आशीर्वाद घेत सामाजिक बांधिलकी जपली. वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमातून मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याबरोबरच ज्येष्ठांना आपुलकीचा सहवास देण्याचा प्रयत्न करण्यात आला. महागड्या पार्ट्यांपेक्षा चिमुकल्यांचे निरागस हास्य आणि ज्येष्ठांचे आशीर्वाद यांत खरा आनंद मिळतो, अशी भावना प्रथमेश जोशी यांनी व्यक्त केली. प्रथमेश जोशी यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत पूर्व जिल्हा संयोजक म्हणून काम पाहिले असून, गेल्या चार ते पाच वर्षांपासून विद्यार्थीहिताच्या विविध उपक्रमांत सहभाग घेतला आहे. सध्या ते वारकरी सेवा समितीचे संस्थापक असून, आषाढी वारीसह विविध प्रसंगी वारकऱ्यांच्या सेवेसाठी सामाजिक उपक्रम राबवतात. या वेळी भाजपचे रुपेश हरकल, मर्चंट असोसिएशनचे योगेश ओझा, अल्पसंख्याक शहराध्यक्ष आसिफ पोपटीया, प्रथमेश पांडे, तेजस उंडे, मनु वैद्य तसेच माऊली वृद्धाश्रमाचे संस्थापक सुभाष वाघुंडे आणि शिरीष वाघुंडे उपस्थित होते. वाढदिवसाच्या आनंदात गरजूंचाही सहभाग असावा, हा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## बंडखोरी रोखण्यासाठी महायुतीचे प्रयत्न
### अनिल सोले यांना अर्ज मागे घेण्याचे बावनकुळेंचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपुर :** डमुंबई- विधान परिषद निवडणुकीतील बंडखोरी रोखण्यासाठी महायुतीच्या नेत्यांचे प्रयत्न सुरू आहेत. भाजपचे नेते अनिल सोले यांनी अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांच्याविरोधात उमेदवारी अर्ज दाखल केल्याने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना माघार घेण्याचे आवाहन केले. पक्ष हा आईसारखा असतो. प्रत्येक वेळी उमेदवारी मिळतेच असे नाही, असे सांगत त्यांनी सोले यांनी दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज मागे घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. बंडखोरीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अमरावती आणि पुणे शिक्षक मतदारसंघांत महायुतीच्या अधिकृत उमेदवारांविरोधात दाखल झालेले अर्ज मागे घेण्यासाठीही चर्चा सुरू असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

अहिल्यानगर जिल्ह्यात शेती महामंडळाच्या जमिनी विविध प्रकल्पांसाठी भाडेपट्ट्याने देण्यात आल्या आहेत. निबे ग्रुप आणि संरक्षण संशोधन व विकास संस्थेला प्रत्येकी सुमारे १,५०० एकर, तर विश्वराज कंपनीला सुमारे १,२०० एकर जमीन दिल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. शेतकऱ्यांसाठी २,५०० एकर जमीन राखीव ठेवण्यात आली असून, मूळ मालकांना जमीन परत देता येईल का, याचाही विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपुरात पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन बावनकुळे यांनी केले. बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याऐवजी प्रक्रिया केलेले पाणी वापरावे. पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर केल्याचे आढळल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला. शहरातील पाणीगळती आणि अपव्यय रोखण्यासोबतच जलसंधारणावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पीककर्जमाफीसाठी घरोघरी ई-केवायसी ई-केवायसीअभावी पीककर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. तलाठी आणि ग्रामसेवक गावनिहाय याद्यांनुसार घरोघरी जाऊन ई-केवायसी पूर्ण करतील, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली. मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून बावनकुळे यांनी काँग्रेसवर टीका केली. मतदारयादीतील त्रुटी दुरुस्त करण्यावर भर द्यावा, असे सांगत त्यांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजाचे समर्थन केले. एसआयआर आणि ईव्हीएमवरून आरोप करण्याऐवजी तथ्यांच्या आधारे भूमिका मांडावी, असेही ते म्हणाले.सचिन वाझे प्रकरणात उच्च न्यायालयाने केलेल्या निरीक्षणांबाबत विचारले असता, न्यायालयाच्या निदर्शनास काही बाबी आल्यामुळे प्रश्न उपस्थित झाले असावेत, अशी प्रतिक्रिया बावनकुळे यांनी दिली.

## हरेगावचे जुने पोस्ट ऑफिस बंदच्या हालचाली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** हरेगावच्या शंभर वर्षांहून अधिक ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पोस्ट ऑफिसवर स्थलांतराचे संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोस्ट ऑफिसची सध्याची इमारत अत्यंत जीर्ण व मोडकळीस आलेली असून, पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याबाबत पोस्ट विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुमारे तीन महिन्यांपूर्वीच ग्रामपंचायतीला पत्र दिले होते. मात्र, तीन महिने उलटूनही पर्यायी जागेबाबत ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे श्रीरामपूर तालुकाध्यक्ष डॉ. गौतम चित्ते यांनी केला आहे. ग्रामपंचायतीच्या या दिरंगाईमुळे हरेगावचे पोस्ट ऑफिस दुसरीकडे हलविण्याच्या हालचाली सुरू झाल्याची माहिती समोर येत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. अनेक वर्षांपासून गावातील नागरिकांच्या सेवेत असलेले पोस्ट ऑफिस गावाबाहेर गेले किंवा बंद पडले, तर त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसणार आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. हरेगावमध्ये आजपर्यंत विविध पदे भूषविलेल्या तथाकथित नेतेमंडळींना गावातील एवढ्या महत्त्वाच्या प्रश्नाची जाणीव नाही का? तीन महिन्यांपासून पर्यायी जागेचा प्रश्न प्रलंबित असताना ही मंडळी नेमकी काय करत आहेत? गावाच्या हिताच्या प्रश्नावर आवाज उठविण्याची वेळ आली की हे नेते कुठे गायब होतात? असा परखड सवाल डॉ. गौतम चित्ते यांनी उपस्थित केला. गावात पदे भूषवायची, राजकारण करायचे; पण गावाच्या मूलभूत सुविधांवर संकट आले की गप्प बसायचे, ही भूमिका कितपत योग्य आहे? हरेगावच्या शंभर वर्षांहून अधिक इतिहास असलेल्या पोस्ट ऑफिसचा प्रश्न तीन महिन्यांपासून प्रलंबित आहे हरेगावच्या पोस्ट ऑफिसचा प्रश्न केवळ ग्रामपंचायतीपुरता मर्यादित नसून, नागरिकांच्या दैनंदिन सेवेशी संबंधित आहे.

## आरोग्य केंद्रात कर्मचारी गायब; मक्तापूरच्या ग्रामसभेत संताप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील मक्तापूर येथे चर्च प्रांगणात झालेल्या विशेष ग्रामसभेत आरोग्य सेवेच्या ढिसाळ कारभारावरून ग्रामस्थ व महिलांनी तीव्र संताप व्यक्त केला. आरोग्य उपकेंद्रातील कर्मचारी वेळेवर हजर राहत नसल्याने तसेच आरोग्य सेविका मुख्यालयात राहत नसल्याने रात्री-अपरात्री रुग्णांची गैरसोय होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. समुदाय आरोग्य अधिकारी पद ही महिनोमहिने रिक्त असल्याने आरोग्य व्यवस्था कोलमडल्याची तक्रार यावेळी करण्यात आली.

मराठा सुकाणू समितीचे प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या ग्रामसभेत बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी तसेच आरोग्य केंद्रातील रिक्त पदे तातडीने भरावीत अशी मागणी करण्यात आली. ग्रामसभेत विविध विकासकामांचे ठरावही मांडण्यात आले. शाळा व मुख्य चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, मंजूर घरकुलांचे थकीत हप्ते व १५ हजार रुपयांची रक्कम जमा करण्याची मागणी करण्यात आली. प्रशासक गणेश सवई यांनी दलित वस्ती सुधार योजनेतून रस्त्यासाठी निधी मंजूर असल्याचे सांगितले. आरोग्य केंद्रासंदर्भातील तक्रारी मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले. ग्रामसभेस पूनमचंद साळवे, माणिकचंद साळवे, माजी उपसरपंच छबुराव बर्डे, उपसरपंच विधान साळवे, प्रदीप साळवे, ग्रामसेवक दत्तात्रय गर्जे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## शारदीय नवरात्रोत्सवा निमित्ताने जोगेश्वरी मंदिरात हरिनाम सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** शारदीय नवरात्री उत्सव सोहळ्यानिमित्त राहुरी तालुक्यातील तिळापूर येथील जोगेश्वरी माता मंदिरात ता ११ पासून ते २० ऑक्टोबरपर्यंत अखंड हरीनाम सप्ताहाचे व ग्रंथराज ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमानुसार पहाटे काकड आरती, त्यानंतर विष्णुसहस्रनाम सकाळी ८ ते १२ यावेळेत ज्ञानेश्वरी पारायण दुपारी ३ ते ५ यावेळेत कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या दरम्यान सुवर्णाताई जमादार, दत्त गिरी महाराज अंकुश महाराज जगताप प्रभाकर महाराज कावले रामगिरी महाराज येळीकर, प्रकाश महाराज आव्हाड, ऋषिकेश महाराज किसन महाराज पवार, तसेच योगेश महाराज पवार शास्त्री यांची कीर्तने होणार आहेत. यावेळी येथील ग्रामस्थांच्या वतीने भाविकांना अन्नदान, नाष्टा, देण्यात येणार असून हभ प मच्छिंद्र चोरमले यांचे काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन समस्त भजनी मंडळ व सेवेकरी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# लोणी बसस्थानकाचा होणार कायापालट !
## दर्जेदार कामासह प्रवाशांच्या सुविधांना प्राधान्य ; पालकमंत्र्यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** प्रतिनिधी : प्रवरा परिसरातील सार्वजनिक वाहतुकीचे महत्त्वाचे केंद्र असलेल्या लोणी बसस्थानकाच्या नूतनीकरणाला सुरुवात झाली असून, या कामामुळे बसस्थानकाचा चेहरामोहरा बदलण्याची अपेक्षा आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंधारण मंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी नूतनीकरणाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. कामाचा दर्जा राखतानाच ते नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी परिवहन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले.




लोणी बसस्थानक हे प्रवरा परिसरातील अनेक गावांच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय, वैद्यकीय उपचार आणि शासकीय कामांसाठी दररोज मोठ्या संख्येने नागरिक या बसस्थानकावर अवलंबून असतात. त्यामुळे बसस्थानकाच्या नूतनीकरणाकडे परिसरातील प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

बसस्थानकाच्या कामाची पाहणी करताना ना. विखे पाटील यांनी बांधकामाचा दर्जा, परिसरातील स्वच्छता, प्रवाशांना उपलब्ध होणाऱ्या सुविधा आणि एकूण व्यवस्थापनाचा आढावा घेतला. नूतनीकरणाचे काम केवळ इमारतीच्या दुरुस्तीपुरते मर्यादित न ठेवता प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन आवश्यक सुविधांचा विकास करण्यावर त्यांनी भर दिला.

सार्वजनिक सुविधांच्या कामात गुणवत्ता आणि नियोजनाला सर्वोच्च प्राधान्य असणे आवश्यक आहे. बसस्थानकाच्या नूतनीकरणात बांधकामाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, तसेच निर्धारित नियोजनानुसार काम पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणेने दक्षता घ्यावी, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. बसस्थानकाच्या नूतनीकरणामुळे प्रवरा परिसरातील प्रवाशांच्या सुविधांमध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. आता हे काम नियोजित पद्धतीने आणि गुणवत्तेचे निकष पाळून पूर्ण होण्याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे. यावेळी लोणी ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, लोणी बसस्थानक प्रमुख, संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला डॉ. जयश्रीताई थोरात यांचा पाठिंबा

## ‘आयोगातील त्रुटी दूर करून दोषींवर कारवाई करा’



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे / संगमनेर** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध मागण्यांसाठी पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी भेट देऊन पाठिंबा दिला.

विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन दोषींवर जबाबदारी निश्चित करावी आणि त्यांनी राजीनामा द्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. ‘समाजातील आणि आयोगातील ब्लड कॅन्सर ठीक करायचा आहे,’ असे विधानही त्यांनी यावेळी केले.

गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी विद्यार्थ्यांना स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले. आंदोलनादरम्यान गुन्हे दाखल झाले तरी घाबरू नका, त्याकडे पदक म्हणून पाहा, असे त्या म्हणाल्या. आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या विद्यार्थिनींचे कौतुक करत, त्यांच्या संघर्षात पालकांनी आणि समाजाने खंबीरपणे साथ द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. संत, शाहू, फुले आणि आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात विद्यार्थ्यांनी एकजूट कायम ठेवावी, असे त्या म्हणाल्या.

माजी महसूल व शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांचाही आंदोलनाला पाठिंबा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी संगमनेरमधील सुमारे ५० युवक कार्यकर्ते त्यांच्यासोबत उपस्थित होते. आमदार रोहित पवार, माजी मंत्री डॉ. विश्वजीत कदम, आमदार अंबादास दानवे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्यासह विविध मान्यवरही आंदोलनात सहभागी झाले होते.

द • ख • ल

### यशस्वी रणनीती म्हणजे वक्तृत्व : मुख्यध्यापक दरंदले

**सोनई** : आधुनिक युग हे स्पर्धात्मक युग असून सर्व क्षेत्रात तीव्र स्वरूपाची स्पर्धा आहे, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर अनेक कौशल्य, कला,, आत्मसात करून विद्यार्थ्यांतून अपेक्षित नेतृत्व गुण संपन्न करून घेणे हे विद्यालयाचे कर्तव्य असल्याचे मत स्व. तुकारामजी पा गडाख संचालित पानसवाडी आदर्श प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल दरंदले यांनी व्यक्त केले. ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या होत्या त्या निमित्ताने ते बोलत होते. यामध्ये ङ्घऋ ते ४ थी या सर्व वर्गातील ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यात किलबिल गट, लहान गट तसेच मोठा गट अशा तिन्ही गटातील उत्कृष्ट वक्तृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांचे चरित्र आपल्या गोड वाणीतून व्यक्त केले. तसेच जीवनात पाण्याचे महत्व व भविष्यात उद्भवणाऱ्या पाण्याची समस्या या विषयावर आधारित आपले विचार मांडले. किलबिल गटात प्रथम क्रमांक सत्यम रवींद्र सोनवणे, द्वितीय क्रमांक सिद्दी महेश बेल्हेकर तर तृतीय फातिमा मोसिम सय्यद यांनी प्राप् केले. मध्यम गटात प्रथम समर्थ प्रकाश गर्जे, द्वितीय क्रमांक शरण्या देविदास कदम तर तृतीय क्रमांक अवनी वैभव बेल्हेकर यांनी पटकावला. तसेच मोठ्या गटात प्रथम क्रमांक श्रेया सोन्याबापू शिंदे द्वितीय क्रमांक समीक्षा सचिन बोरुडे तृतीय क्रमांक श्रेया मनोज बोरुडे यांनी प्राप्त केला. विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्षा जयश्रीताई गडाख आणि सचिव रविराज गडाख यांनी केले. या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक अनिल दरंदले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

### दुष्काळजन्य परिस्थितीमुळे १६ चारीला पाणी सोडा, मागणी




**टाकळीभान** : दुष्काळजन्य परिस्थितीमुळे जनावरांच्या चाऱ्या पाण्याची अडचण निर्माण होत असून पाऊस कमी झाल्याने शेतातील पिकांना पाण्याची आवश्यकता आहे. पाण्याअभावी तोंडाशी आलेली पिके करपून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या रोटेशन मधून टाकळीभान येथील चारी नं. १६ ला पाणी सोडून या चारी वरील सर्व शेतकऱ्यांचे भरणे काढावे. तसेच गावतळे व ओढ्यावरील ४० ते ५० बंधारे भरण्याची मागणी टाकळीभान येथील शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे, तसे निवेदन त्यांनी वडाळा महादेव उपविभागीय जलसंपदा कार्यालयाला दिली. पाणी न सोडल्यास पाण्यासाठी कोणतीही पूर्व सूचना न देता महाराष्ट्र राज्य मार्ग क्रमांक ४४ श्रीरामपूर- नेवासा रोडवर आंदोलनाचा इशारा येथील शेतकऱ्यांनी दिला आहे. या निवेदनावर काकासाहेब कोकणे, पंकज पटारे, साईनाथ खंडागळे, संतोष पटारे, विलास बोडखे, गोरख खंडागळे, नवनाथ खंडागळे, राहुल बनकर,बापू शिंदे,आदी शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

## यशस्वी रणनीती म्हणजे वक्तृत्व : मुख्याध्यापक अनिल दरंदले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : आधुनिक युगात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करून नेतृत्वगुण विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात वक्तृत्वकलेचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे मत पानसवाडी आदर्श प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल दरंदले यांनी व्यक्त केले.



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त स्व. तुकारामजी पा. गडाख संचालित पानसवाडी आदर्श प्राथमिक विद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एलकेजी ते चौथीच्या ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महात्मा गांधी यांचे चरित्र तसेच पाण्याचे महत्त्व आणि भविष्यातील पाणीटंचाई या विषयांवर विद्यार्थ्यांनी विचार मांडले.

किलबिल गटात सत्यम सोनवणे, सिद्दी बेल्हेकर व फातिमा सय्यद यांनी, मध्यम गटात समर्थ गर्जे, शरण्या कदम व अवनी बेल्हेकर यांनी, तर मोठ्या गटात श्रेया शिंदे, समीक्षा बोरुडे व श्रेया बोरुडे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा जयश्रीताई गडाख व सचिव रविराज पा. गडाख यांनी अभिनंदन केले. मुख्याध्यापक अनिल दरंदले यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडली.

## वैद्यकीय शिक्षण आणि जिद्दीचा संगम, डॉ. मयुरी खेवरे राज्यात तृतीय क्रमांक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : मातृत्व, बाळाची काळजी आणि वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षणाचा अत्यंत कठीण प्रवास यांचा समर्थपणे समतोल साधत सांगलीच्या डॉ. मयुरी भाऊसाहेब खेवरे यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (चणक्ड), नाशिक यांच्या जलींर्शीीळली त्र्र्ूसरशलेश्रेसू (प्रसूती व स्त्रीरोगशास्त्र) विषयाच्या पदव्युत्तर परीक्षेत महाराष्ट्र राज्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाने अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव राज्यभरात उज्ज्वल केले आहे.

विशेष म्हणजे, परीक्षेच्या काळात डॉ. मयुरी यांचा मुलगा पद्मराज अवघ्या सहा महिन्यांचा होता. एका बाजूला मातृत्वाची जबाबदारी, बाळाची संगोपन आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या, तर दुसऱ्या बाजूला वैद्यकीय शिक्षणातील कठोर अभ्यास आणि परीक्षेची तयारी, अशा दुहेरी आव्हानांना पुरून उरत त्यांनी मिळवलेले हे यश विशेष प्रेरणादायी ठरले आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले असून, त्यांच्या या कामगिरीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात अभिमानाचा माहोल निर्माण झाला आहे. आपल्या यशाबद्दल भावना व्यक्त करताना डॉ. मयुरी खेवरे म्हणाल्या, या यशामागे माझ्या गुरुजनांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचे आशीर्वाद आणि माझ्या पतीचा मोलाचा पाठिंबा आहे. यामुळेच हे यश शक्य झाले.

डॉ. मयुरी खेवरे या शिवसेना पक्षाचे नेते रावसाहेब खेवरे यांच्या पुतणी आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यभरातून खेवरे कुटुंबीय आणि मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे. मातृत्व ही जबाबदारी आणि स्वप्नपूर्ती ही जिद्द या दोन्हींचा सुंदर समतोल साधत डॉ. मयुरी खेवरे यांनी मिळवलेले हे यश संपूर्ण राज्यातील अनेक विद्यार्थिनी, माता आणि तरुण डॉक्टरांसाठी एक नवा आदर्श ठरले आहे.

## आ. विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते महिलांच्या बचत गटांना धनादेशाचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : शासकीय योजनेचा लाभ सर्वसामान्य जनतेला घेता यावा यासाठी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या संकल्पनेतून नेवासा तालुक्यातील शिरसगाव येथे आयोजित शासकीय योजनेच्या मार्गदर्शक मेळाव्याला लाडक्या बहिणींसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आपला प्रयत्न राहील असे प्रतिपादन आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी यावेळी बोलतांना केले. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या संकल्पनेतून व सौ.रत्नमालाताई विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिरसगाव येथील जगदंबा माता मंदिराच्या प्रांगणात ज्येष्ठ नागरिक, महिला व नागरिकांसाठी विशेष मार्गदर्शन तसेच शासकीय योजना मेळाव्यात विविध शासकीय योजनांची माहिती देतानाच २० महिला बचत गटांना धनादेशांचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलतांना सौ.लंघे ताई म्हणाल्या की महिलांना सक्षम करण्याबरोबरच मुलांचे भविष्य घडविणे ही देखील आपली जबाबदारी असूनकधीही आई म्हणून मला हाक द्या, तुमच्या हाकेला मी ओ देण्यासाठी तत्पर आहे. प्रत्येक महिला आपल्या कुटुंबासाठी धडपडत असते. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याबरोबरच आपल्या मुलांचे भवितव्य घडविण्यासाठी योग्य संस्कार देण्याची देखील आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी आपल्या मनोगतातून दुष्काळी परिस्थितीचा मुद्दा गांभीर्याने उपस्थित केला ते म्हणाले की संपूर्ण नेवासा तालुक्यात दुष्काळाच्या झळा जाणवत आहेत. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत एकही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या टंचाई आढावा बैठकीत तालुक्यातील परिस्थितीवर चर्चा झाली असून, तलाठी व कृषी सहाय्यकांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी करून राहिलेले पंचनामे तातडीने पूर्ण करावेत अशा सुचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. पाणी टंचाईचा प्रश्नही गांभीयाने हाताळला जात असून शेतकऱ्यांच्या पिकांसाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी झालेल्या शासकीय योजनांच्या मेळाव्यात संजय गांधी निराधार अनुदान योजना,श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना,इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना,अपंग निवृत्ती वेतन योजना, विधवा निवृत्तीवेतन योजना यांसह विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र नागरिकांना मिळवून देण्यासाठी संबंधीत विभागाचे अधिकारी व कर्मचारी मेळाव्याला उपस्थित होते. पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि योजनेचा लाभ घेण्याची प्रक्रिया याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. तहसीलदार डॉ.संजय बिराजदार म्हणाले की नेवासा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत सुमारे ५० टक्के पंचनामे पूर्ण झाले असून उर्वरित पंचनामे ही लवकरच पूर्ण करण्यात येतील प्रशासन आमदार लंघे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाभर कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी झालेल्या मेळाव्याच्या प्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,सौ.रत्नमालाताई लंघे पाटील, तहसीलदार डॉ.संजय बिरादार,गटविकास अधिकारी संजय लखवाल, कृषी अधिकारी धनंजय हिरवे, पुरवठा निरीक्षक सुदर्शन दुर्योधन,तालुका अभियान व्यवस्थापक अर्जुन सोनवणे,ग्रामसेवक आगळे भाऊसाहेब,राजेंद्र निंबाळकर,डॉ.देवरे,रविंद्र काळे,ज्ञानेश्वर कांबळे, प्रदीप ढोकणे,लक्ष्मण सुडके,दत्तात्रय पोटे,नवनाथ साळुंके, सुनील वाघमारे,गणेश लंघे,राजेंद्र पोटे,दादासाहेब पोटे, गणेश चौघुले,आदिनाथ पटारे,किरण शिंदे,विवेक लंघे, सुरेश गायकवाड, रमेश शिरोडे, मच्छिंद्र मुंगसे, आदिनाथ भोरे,वांडेकर मॅडम, शालिनी लंघे,भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ.मंगलताई काळे,रजनी शिंदे, पदमा शेरकर यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## प्रवरा कृषीच्या खेळाडूंना कुस्ती व शरीरसौष्ठव स्पर्धेत सुवर्ण व रौप्य पदके

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : मिरजगाव येथील सदगुरू कृषि महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन कुस्ती व शरीर सौष्ठव स्पर्धेत लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या दोन खेळाडूंना अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदके प्राप्त केलेले आहे. या खेळाडूंमध्ये ५७ किलो वजनी गटाच्या कुस्ती स्पर्धेत शिवम लेकुरवाळे याने सुवर्ण पदक तर गणेश धडांबे याने ६२ किलो वजनी गटाच्या शरीर सौष्ठव स्पर्धेत रौप्य पदक मिळविले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत १० जिल्हातील ३५ महाविद्यालयातील खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.



या दोन्ही खेळाडूंचा संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल खडके , कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा स्वरांजली गाढे, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ काजल खंडागळे व अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ शुभांगी निळे आदी उपस्थित होत्या. या यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा. सिताराम वरखड यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील,माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालिनीताई विखे पाटील, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील,अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ.शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे , प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ.उत्तमराव कदम आदींनी अभिनंदन केले.

## कोल्हारच्या भगवती मातेच्या नवरात्र महोत्सवास प्रारंभ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : साडेतीन शक्तिपीठांच्या एकत्रित दर्शनाचा लाभ मिळणाऱ्या श्री क्षेत्र कोल्हार भगवतीपूर येथील भगवती मातेच्या नवरात्र महोत्सवास आजपासून उत्साहात प्रारंभ होत आहे. यानिमित्त मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी सकाळी नऊ वाजता अभिषेक, पूजा व घटस्थापनेने महोत्सवाची सुरुवात होणार आहे. दररोज पहाटे ५.१५ वाजता व सायंकाळी ७.१५ वाजता महाआरती, सकाळी सामुदायिक दुर्गाशक्ती सप्तशती पाठ आणि दुपारी देवी महात्म्य कथेचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रात कीर्तन, रांगोळी स्पर्धा, दांडिया, नृत्य स्पर्धा, गरबा आणि विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. विजयादशमीला जगदंबा माता यज्ञ, होमहवन आणि देवीची महाआरती होईल.



मंदिराच्या कळसासह परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. भाविकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यंदाही गाभारा दर्शन बंद ठेवण्यात येणार असून भाविकांना भगवती मातेचे मुखदर्शन व पादुकांचे दर्शन घ्यावे लागणार आहे. मंदिर परिसरात लोणी पोलिसांच्या वतीने बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. महोत्सव यशस्वी करण्यासाठी कोल्हार भगवतीपूर देवालय ट्रस्टचे विश्वस्त व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# समता पतसंस्थेला एनसीडीसीकडून १०० कोटींचा निधी

## सोनेतारण कर्जासाठी निधीचा उपयोग



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : भारतातील सहकारी संस्थांच्या व्यवसायवाढीसाठी मार्गदर्शन करण्याबरोबरच त्यांना निधी उपलब्ध करून देणाऱ्या भारतीय राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) यांच्या माध्यमातून समता नागरी सहकारी पतसंस्थेला १०० कोटी रुपयांच्या निधी मंजुरीचे पत्र राष्ट्रीय सहकार विकास निगम, पुणेचे रिजनल डायरेक्टर गिरीराज अग्निहोत्री यांच्या हस्ते समता पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले. यावेळी अधिक माहिती देताना संस्थेचे संचालक संदीप कोयटे म्हणाले की, गुणवत्तेच्या निकषांवर सहकारी संस्थांची तपासणी करून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून हा निधी उपलब्ध करून दिला जातो. समता पतसंस्थेला मंजूर झालेल्या या निधीचा विशेषतः सोनेतारण कर्ज वाटपासाठी उपयोग केला जाणार आहे.

समता पतसंस्थेने गेल्या ४० वर्षांत केलेली गुणवत्तापूर्ण व्यवसायवाढ तसेच महाराष्ट्रातील इतर सहकारी पतसंस्थांना दिलेले मार्गदर्शन यामुळे समताला मिळालेला हा निधी इतर सहकारी संस्थांसाठीही मार्गदर्शक ठरेल, असे गिरीराज अग्निहोत्री यांनी सांगितले. समताचा आदर्श घेऊन इतर पतसंस्थांनीही गुणवत्तापूर्ण व्यवसायवाढीसाठी प्रयत्न करावेत आणि देशभरात सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे व्हा. चेअरमन अरविंदभाई पटेल म्हणाले की, समताची कठोर थकबाकी वसुली, विशेषतः गेल्या तीन वर्षांत सोनेतारण कर्जवाटपात झालेली लक्षणीय वाढ आणि ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास या बाबींमुळे हा निधी संस्थेला प्राप्त झाला आहे. या निधीचा उपयोग संस्थेच्या प्रगतीसाठी करून समताला आणखी उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. संस्थेचे सरव्यवस्थापक सचिन भट्टड म्हणाले की, या निधीचा उपयोग सहकाराचे नाव उज्ज्वल करण्याबरोबरच इतर सहकारी संस्थांच्या वाढीसाठीही केला जाईल. गेल्या ४० वर्षांत समताने ग्राहकांचा विश्वास संपादन केला असून, केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून मिळालेला निधी हा त्या विश्वासाला मिळालेली महत्त्वाची पावती आहे.

यावेळी समता पतसंस्थेचे व्हा. चेअरमन अरविंद पटेल, ज्येष्ठ संचालक जितुभाई शहा, कचरू मोकळ, संचालक संदीप कोयटे, दीपक अग्रवाल, गिरीश सोनेकर, संचालिका श्वेता अजमेरा, अक्षरा पटेल, स्वाती कोयटे, समता महिला बचत गटाच्या अध्यक्षा सुहासिनी कोयटे, जनरल मॅनेजर सचिन भट्टड तसेच मुख्य कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

### ‘सहकार बास्केट’मधून मिनी मेझॉन उभारणार

काका कोयटे यांच्या मार्गदर्शनाखाली समता पतसंस्था लवकरच ‘सहकार बास्केट’च्या माध्यमातून मिनी मेझॉन उभारण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. हा उपक्रम राष्ट्रीय सहकार विकास निगमामार्फत संपूर्ण भारतभर राबविण्यात येणार असल्याचे गिरीराज अग्निहोत्री यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांना कमी व्याजदरात सोनेतारण कर्ज

महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था शेतकऱ्यांना कमी व्याजदरात सोनेतारण कर्ज उपलब्ध करून देत असल्याने खासगी फायनान्स कंपन्यांकडून होणारी शेतकऱ्यांची आर्थिक लूट थांबण्यास मदत होत आहे. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना कमीत कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याची माहिती समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा कोयटे यांनी दिली.

## बेल्हेकरच्या विद्यार्थ्यांची विभागीय थलेटिक्स स्पर्धेसाठी निवड



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : लोणी येथे पार पडलेल्या नेवासा जिल्हा स्तरीय शालेय थलेटिक्स स्पर्धेत बेल्हेकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या ज्ञानेश्वर इंटरनॅशनल स्कूल व ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलच्या तब्बल चार विद्यार्थ्यांनी विभागीय स्पर्धे साठी निवड झाली. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये स्वानंद विनोद गडदे १४ वर्षीय गटात गोळा फेक, जिल्हास्तरीय प्रथम भावेश फुलदास राऊत १७ वर्षीय ८०० मीटर, जिल्हास्तरीय प्रथम अर्चना माधव तुंगार १७ ४०० मीटर हर्डल, जिल्हास्तरीय प्रथम पुनम दिलबरसिंग पावरा १९ वर्षीय ४०० मीटर हर्डल जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक.

या सर्व विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश बेल्हेकर, संचालिका डॉ. रंजनाताई बेल्हेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक बेल्हेकर, कॅम्पस डायरेक्टर डॉ. अ. इंगळे, डॉ. अ. हारदे, प्राचार्य काकासाहेब वाल्हेकर आणि प्राचार्य गौरव खुटाळ सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व क्रीडा शिक्षक रविंद्र आदमाने, प्रकाश पाचे अभिनंदन केले. विभागीय स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

# कन्याकुमारीहून आणलेल्या मुळगंगा मातेच्या ज्योतीचे आज आगमन

# सावरगाव तळच्या शंभर तरुणांचा दक्षिण भारतातील तीर्थक्षेत्रांचा प्रवास

**दक्षिणेतील तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेत ज्योत मायभूमीत**

दक्षिण महाराष्ट्रातील पंढरपूरच्या पांडुरंग विठ्ठलाचे तसेच अक्कलकोट, येथील स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेऊन कर्नाटकातील गाणगापूर, आंध्र प्रदेशातील श्रीशैल्यम, पाताळगंगा, महानंदी, तिरुपती बालाजी,तसेच तमिळनाडूमधील कांचीपुरम, वेल्लोर, रामेश्वरम, असा प्रवास करत ते थेट कन्याकुमारी पोहोचले तेथील कन्याकुमारी मातेचे दर्शनघेत ज्योत प्रज्वलित करून माय भूमीकडे निघाले , सुचिंद्रम, तिरुअनंतपुरम येथील पद्मनाभस्वामी मंदिर, मदुराई येथील मीनाक्षी मंदिर, म्हैसूर, चामुंडी हिल, मुरुडेश्वर, मुरुडेश्वर बाळूमामा देवस्थान आदमापूर, कोल्हापूरची महालक्ष्मी माता, ज्योतिबा मंदिर आणि रंकाळा आदी ठिकाणांचा समावेश आहे.

**कन्याकुमारी येथून ज्योत आणण्याचा संकल्प पूर्ण करताना या तरुणांनी अनेक धार्मिक स्थळांचे दर्शन घतले. आता या यात्रेची सांगता मुळगंगा मातेच्या चरणी ज्योत अर्पण करून होणार आहे. गावाच्या शिवेवर ज्योतीचे स्वागत करण्यासाठी ग्रामस्थांकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.**

**मुळगंगा माता नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही गावात नऊ दिवस विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे गावातील प्रत्येक वाडीला एक दिवस माळ आणण्याचा मान दिला जातो. त्यानुसार प्रत्येक वाडीतर्फे धार्मिक विधी, पूजाअर्चा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या परंपरेमुळे संपूर्ण गावात उत्सवाचे वातावरण निर्माण होते, तसेच ग्रामस्थांमध्ये एकोपा आणि भक्तिभाव वृद्धिंगत होतो.**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ येथील ग्रामदैवत आणि जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाणारे मुळगंगा माता नवरात्र उत्सवानिमित्त यंदा गावातील तरुणांनी थेट दक्षिण भारतातील कन्याकुमारी येथून पवित्र ज्योत आणली आहे. या ज्योतीचे आगमन आज रविवारी गावाच्या शिवेवर होणार असून, तेथून मुळगंगा मातेचा जयजयकार करत, ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात ज्योत गावात आणली जाणार आहे.आमदार अमोल खताळ पाटील यांच्या हस्ते ज्योतीचे स्वागत होणार आहे. या सोहळ्यासाठी ग्रामस्थ आणि भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

. दरवर्षी नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने विविध तीर्थक्षेत्रांतून पवित्र ज्योत आणण्याची परंपरा सावरगाव तळ



येथील तरुणांनी जपली आहे. मागील वर्षी तरुणांनी जम्मू-काश्मीरमधील वैष्णोदेवी येथून ज्योत आणली होती. यंदा त्यांनी दक्षिण भारताचे टोक असलेल्या कन्याकुमारी येथून ज्योत आणण्याचा संकल्प केला. त्यानुसार मुळगंगा माता तरुण मित्र मंडळाच्या सुमारे शंभर तरुणांनी एकत्र येत या धार्मिक यात्रेचे नियोजन केले.त्या नुसार कन्याकुमारी देवीचे दर्शन घेतल्यानंतर तेथून प्रज्वलित केलेली ज्योत घेऊन हे तरुण आपल्या मायभूमीकडे रवाना झाले आहेत. तरी या ज्योत आगमन सोहळ्यास सोहळ्यास ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सावरगाव तळ ग्रामस्थ व मुळगंगा तरुण मित्र मंडळ यांनी केले आहे.

## कच्च्या रस्त्याने अवैध वाळू वाहतूक, तहसीलदारांची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** खबऱ्यांना चकवा देत कच्च्या रस्त्याने घटनास्थळी पोहोचलेल्या तहसीलदार सुनील सावंत यांनी लासूरगाव परिसरात अवैध वाळू वाहतुकीचा प्रकार उघडकीस आणला. जानकाई घाट राजुरा रोडवर विनापरवाना एक ब्रास वाळूची वाहतूक करणारा ट्रॅक्टर गुरुवारी रात्री पकडण्यात आला. लासूरगाव येथे अवैध वाळू वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती महसूल प्रशासनाला मिळाली होती. यानंतर तहसीलदार सावंत यांनी संबंधितांना कारवाईची चाहूल लागू नये, यासाठी कच्च्या रस्त्याचा मार्ग निवडला. यावेळी निळ्या रंगाचे हेड आणि लालसर रंगाची ट्रॉली असलेला ट्रॅक्टर (क्र. चक ५७ २९९४) वाळूची वाहतूक करताना आढळला. ट्रॅक्टरचालक गणेश नंदकिशोर जाधव (रा. लासूरगाव) याच्याकडे वाळू वाहतुकीचा परवाना मागितला असता, त्याने परवाना नसल्याचे सांगितले. तसेच ट्रॅक्टरचा मालक आपणच असल्याचे त्याने स्पष्ट केले. त्यामुळे विनापरवाना वाहतूक होत असल्याचे समोर आले. तहसीलदार सुनील सावंत, मेजर रक्ताटे, संजय ठमके आणि पोलीस पाटील कारभारी निघोटे यांनी ही कारवाई केली. अवैध वाळू वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने केलेल्या या कारवाईमुळे परिसरात चर्चा सुरू झाली आहे.

## जिल्हा परिषद शाळेसाठी सात वर्षांपासून शिक्षकाचा नाही..

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील बोरसर जिल्हा परिषद शाळेत गेल्या सात वर्षांपासून गणित विषयासाठी शिक्षकच नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, हा मुद्दा आता जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या बैठकीत उपस्थित करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद सदस्य तथा स्थायी समिती सदस्य मनोज पाटील गायके यांनी हा प्रश्न उपस्थित करत तीव्र संताप व्यक्त केला. वारंवार पाठपुरावा करूनही



शाळेला गणित विषयाचा शिक्षक मिळत नसल्याने त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

गणितासारख्या महत्त्वाच्या विषयासाठी शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान होण्याची शक्यता आहे. मग सात वर्षांपासून या शाळेला गणिताचा शिक्षक का मिळाला नाही? विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे का, असे प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत.बोरसर जिल्हा परिषद शाळेला तातडीने गणित विषयाचा शिक्षक उपलब्ध करून द्यावा आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवावे, अशी मागणी मनोज गायके यांनी केली आहे. आता तरी प्रशासनाला जाग येणार का? बोरसरच्या विद्यार्थ्यांना गणिताचा शिक्षक कधी मिळणार? याकडे विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## वरखेडदेवी येथे श्रीमद देवी भागवत कथा' ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील वरखेड (देवी) येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त 'संगीत श्रीमद देवी भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. ११ ऑक्टोबर ते मंगळवार दि. २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.



श्री लक्ष्मी कृपेने आयोजित या नवरात्रोत्सव व त्यानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन ह.भ.प. गुरुवर्य महंत भास्करगिरीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने, ह.भ.प. स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने तसेच ह.भ.प. कृष्णा महाराज हारदे माळेवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. या सोहळ्यात भागवताचार्य ह.भ.प. वैभव महाराज माळखेडे (मु.पो. टाकरेसडे, ता. शेवगाव) यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद देवी भागवत कथेचे निरूपण होणार आहे. दररोज सायंकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत कथा होणार असून, विविध धार्मिक व आध्यात्मिक विषयांवर भक्तांना मार्गदर्शन मिळणार आहे. नवरात्रोत्सवाच्या कालावधीत देवी भागवत कथेबरोबरच भजन, कीर्तन व भजनी मंडळांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दररोज दुपारी १ ते ३ या वेळेत कवीरपंथी भजन, तसेच रात्री देवी भागवत कथा होणार आहे. वरखेड, रामडोहे, जळका व पंचक्रोशीतील भजनी मंडळांचा सहभाग राहणार आहे. या धार्मिक सोहळ्याचा समारोप मंगळवार दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ वाजता ह.भ.प. सचिन महाराज पवार यांच्या काल्याच्या हरि कीर्तनाने होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.नवरात्रोत्सवातील या भक्तिमय ज्ञानयज्ञ सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थान स्ट्रस्ट अध्यक्ष व सर्व विश्वस्त मंडळी व आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**CHANGE OF THE NAME**

OLD NAME NAZEEM HUSAIN NOOR MOHAMED
NEW NAME NAZIM HUSSAIN NOOR MOHAMMED QURESHI
ADDRESS PATEL APPT NALASOPARA

**CHANGE OF THE NAME**

Old Name Akbar Nazim Qureshi Shiddique. New name Siddique Akbar Nazim Qureshi. Address patel appt NALASOPARA

**CHANGE OF THE NAME**

OLD NAME HUSSAIN QURESHI NUSRAT NAZIM. NEW NAME NUSRAT NAZIM HUSSAIN QURESHI. ADDRESS PATEL APPT NALASOPARA

## ग्रामीण महाराष्ट्रातून दिल्लीच्या दरबारात 'राष्ट्र सह्याद्री'चा डंका!

पान १ वरुन

सन्मान होणे ही अभिमानाची बाब आहे. पुरस्कारामुळे केवळ पुरस्कारार्थींचाच गौरव होत नाही, तर त्यांना सन्मानित करणाऱ्या संस्थेची प्रतिष्ठाही वाढते. ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांनी राजकारणासह सहकार, साहित्य, पर्यावरण आणि जिल्ह्याच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. त्यांना 'सह्याद्री रत्न' आणि जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे.

पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या सहकार व शिक्षण क्षेत्रातील कार्याचा वारसा पुढे नेणाऱ्या डॉ. सुष्मिता विखे पाटील यांना 'सह्याद्री शिक्षणरत्न' पुरस्कार मिळणे ही आमच्यासाठीही गौरवाची बाब आहे, असे त्यांनी नमूद केले.

अवघ्या सात वर्षांत आठ जिल्ह्यांपर्यंत विस्तार करून दिल्लीपर्यंत झेप घेणाऱ्या राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाची वाटचाल कौतुकास्पद आहे. संपादक करण नवले यांच्या जिद्दीला आणि मेहनतीला दाद देण्यासाठीच आपण या सोहळ्यासाठी दिल्लीत आलो आहोत, असे गौरवोद्गार विखे पाटील यांनी काढले.

**लोकशाहीच्या रक्षणासाठी माध्यमांनी पुढाकार घ्यावा...**

काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी जबाबदार आणि विकासाची दृष्टी असलेल्या माध्यमांची आज देशाला गरज असल्याचे सांगितले. राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाने लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपल्या खास शैलीत राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहावर कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. महाराष्ट्राच्या इतिहासातील 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला' या अभिमानास्पद परंपरेचा संदर्भ देत ते म्हणाले, की आता आपला 'राष्ट्र सह्याद्री' दिल्लीत आला आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून दैनिकाला निश्चितच सहकार्य करू, 'मैं तो नही करता झुटीं बात, हमेशा दूंगा राष्ट्र सह्याद्री को साथ', अशी कविता सादर करून ग्वाहीही त्यांनी दिली.

धर्मयोद्धा सुरेश चव्हाणके, भाजप नेते श्याम जाजू आणि जगद्गुरू महंत अरुणनाथगिरीजी महाराज यांनी राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाच्या वाटचालीचे तसेच पुरस्कारप्राप्त मान्यवरांच्या कार्याचे कौतुक केले.

सोहळ्यात ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांना 'सह्याद्री रत्न' जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. याशिवाय शिक्षण, सहकार, उद्योग, धर्म, सेवा, कृषी, प्रशासन, आरोग्य, कायदा, क्रीडा, व्यापार आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना 'सह्याद्री रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे संस्थापक-संपादक करण नवले यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. सातव्या वर्धापनदिनानिमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या 'सह्याद्रीरत्न गौरव विशेषांकाचे' मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. ज्येष्ठ कलावंत नाना पाटेकर यांना प्रारंभी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मान्यवरांनी त्यांच्या कलाक्षेत्रातील योगदानाच्या आठवणींना उजाळा देत आदरांजली वाहिली. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली, तर राष्ट्रगीताने सोहळ्याचा समारोप झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रसह्याद्री टीम बरोबरच साई भजन संध्याचे संचालक विश्वनाथ ओझा, सचिन सारंगधर, मराठी पत्रकार संघाचे सचिव सुरेश कांगुणेसुमित चौधरी, करजगांवचे सरपंच योगेश कारंगळे, यांच्यासह पत्रकारांनी परिश्रम घेतले. प्रसिद्ध निवेदक संतोष मते, अक्षदा रोकडे,, प्रवीण जमधडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख मान्यवरांना चित्रकार रवी भागवत यांनी रेखाटलेली चित्र भेट देण्यात आली. दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या कार्यकारी संपादक पूनम नवले यांनी आभार मानले.

## नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांचा रोटरी क्लबच्या वतीने सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** श्रीरामपूर येथील रोटरी क्लबच्या वतीने नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील यांचा समर्पण फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्रदान दृष्टी दान बांधकाम मजुरांसाठीचे निस्पृह काम तसेच जायकवाडी जलाशयाच्या भोवती असलेल्या शेतकरी व धरणग्रस्त लाभार्थ्यांचे प्रश्न या विषयात अनेक वर्षांपासून सातत्याने भरीव काम करून समाजात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

श्रीरामपूर रोटरी क्लबचा नूतन पदाधिकारी पदग्रहण समारोहाचा कार्यक्रम पार पडला. मावळते अध्यक्ष उद्धव तांबोळी यांनी आपल्या अध्यक्षपदाची सूत्रे नुतन अध्यक्ष सरबजीत सिंग चुग यांच्याकडे या शानदार कार्यक्रमात सुपूर्द केली.यावेळी समाजात सामाजिक कार्याचे डरे स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात समर्पण फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्रदान दृष्टी दान बांधकाम मजुरांसाठी निस्पृह काम तसेच जायकवाडी जलाशयाच्या भोवती असलेल्या शेतकरी व धरणग्रस्त लाभार्थ्यांचे प्रश्न या विषयात अनेक वर्षांपासून सातत्याने भरीव काम करून समाजात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उठावणारे डॉ. करणसिंह घुले यांचा देखील सन्मान करण्यात आला.

यावेळी रोटरी चे असिस्टंट गव्हर्नर भागनाथ काटे,आमदार हेमंत ओगले, श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण दादा ससाणे, डॉ. दिलीप पडघन, सचिन गुजर व रोटरी क्लबचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## निधनवार्ता

### अभिषेक गाडेकर यांचे निधन



**नेवासा :** नेवासा प्रेस क्लबचे सदस्य व प्रेस फोटोग्राफर तसेच आम्ही नेवासकर पोर्टलचे सहसंपादक अभिषेक शिवाजी गाडेकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ३५ वर्षे होते.

अभिषेक गाडेकर यांच्या पश्चात आई,भाऊ, भावजाई, पुतण्या असा परिवार आहे. नेवासा तालुका एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप गाडेकर यांचे ते धाकटे बंधू होते. अभिषेक गाडेकर यांच्या अकस्मात निधनाने शहरासह तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. झालेल्या अंत्यसंस्कार समयी विविध संघटनेच्या वतीने अभिषेक गाडेकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## भेडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस; वेतन कपातीचे आदेश

**जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची कारवाई; जिल्हा परिषद सदस्या वैजयंती वाल्मिक शिरसाठ यांच्या पाहणीनंतर प्रशासन ॲक्शन मोडवर**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील भेडाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या अनधिकृत गैरहजेरीची गंभीर दखल घेत जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगरच्या आरोग्य विभागाने संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच गैरहजर कर्मचाऱ्यांच्या वेतन कपातीसह विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरेकर यांनी ५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आदेशाद्वे दिले आहेत.

जिल्हा परिषद सदस्या सौ. वैजयंती वाल्मिक शिरसाठ यांनी भेडाळा प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट देऊन पाहणी केली होती. या पाहणीदरम्यान उपस्थिती नोंदीनुसार केंद्रातील आठ कर्मचाऱ्यांपैकी केवळ दोन कर्मचारी उपस्थित असल्याचे, तर वैद्यकीय अधिकारीही मुख्यालयात अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आल्याचा उल्लेख आदेशात करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे अपेक्षित असताना कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे रुग्णसेवेवर परिणाम होत असल्याच्या तक्रारी वारंवार प्राप्त होत असल्याचेही आदेशात नमूद आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संबंधित प्रकरण गंभीरतेने घेतले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना गैरहजेरी आणि कामकाजातील त्रुटींबाबत खुलासा मागविला असून, नोटीस मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. गैरहजर कालावधीसाठी नियमानुसार 'विनावेतन' (छे थेॲज्ञ छे झरू) करण्याची कार्यवाही तसेच अनधिकृत गैरहजेरीची नोंद सेवा पुस्तकात घेण्याबाबतही आदेश देण्यात आले आहेत.

याशिवाय वारंवार गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीवर परिणाम करणारी कारवाई करण्याबाबत खुलासा मागविण्यात आला आहे. संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशीचा प्रस्ताव विहित नमुन्यात सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

तालुका आरोग्य अधिकारी, गंगापूर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन पंचनामा करावा, तसेच कारवाईचा अहवाल आठ दिवसांच्या आत सादर करावा, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणात कोणतीही कसूर खपवून घेतली जाणार नसल्याचा इशाराही जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दिला आहे.

ग्रामीण आरोग्यसेवेतील निष्काळजीपणावर प्रशासनाने घेतलेल्या या भूमिकेमुळे भेडाळा परिसरातील आरोग्यसेवेत सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पान १ वरुन

### जमिनींचा अध्यादेश निघेपर्यंत उद्योगांना पाय ठेवू देणार नाही

ऑटोबर रोजी १२०० एकर जमीन ४९ वर्षांच्या कराराने देण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या मनात शासनाच्या कार्यपद्धतीबाबत शंका निर्माण झाली आहे.उद्योगांसाठी जमीन देण्याचे निर्णय तातडीने होतात; मग मूळ जमीनमालक शेतकऱ्यांना न्याय देणारा अध्यादेश का रखडतो? असा सवाल उपस्थित करत, केवळ न्यायालयीन प्रक्रियेत न अडकता लोकचळवळ आणि संघर्षाच्या माध्यमातून हा प्रश्न सोडविण्याचा निर्धार ॲड. काळे यांनी व्यक्त केला. शासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याच्या निषेधार्थ शेती महामंडळाच्या जमिनींची मोजणी तसेच वेड्या बाभळी काढण्याचे काम रविवारपासून बंद पाडण्याचा निर्णय बैठकीत जाहीर करण्यात आला. पालकमंत्री विखे पाटील यांनी यापूर्वी दिलेल्या आश्वासनांबाबत आमचे दुमत नाही; मात्र नव्या जमीनवाटप निर्णयामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत पुढील संघर्ष करणे अपरिहार्य झाल्याचे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले. बैठकीत ॲड. सर्जे राव घोडे, सोपानराव नाईक, कार्लस साठे, प्रभाकर कांबळे, सरपंच सागर मुठे, बाळासाहेब बकाल, राजेंद्र नाईक, भाऊसाहेब काळे, सचिन वेताळ यांच्यासह नऊ गावांतील अनेक शेतकरी उपस्थित होते. शरद आसने यांनी आभार मानले. अकारी पडीत जमिनींचा प्रश्न आता केवळ जमीनवाटपापुरता मर्यादित राहिलेला नाही; तो शासनाच्या आश्वासनांची अंमलबजावणी, मूळ जमीनमालकांचे हक्क आणि ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांच्या भविष्याशी जोडला गेला आहे. त्यामुळे शासन आता कोणती भूमिका घेते, याकडे नऊ गावांसह संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

### तीन माजी मुख्यमंत्र्यांसह चार हजार जण ताब्यात

म्हणजे अंदाजे २३ हजार जवान तैनात करण्याची योजना असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्याशिवाय दिल्ली पोलिसांचे किमान १५ हजार कर्मचारी तैनात करण्याचे नियोजन असल्याचा दावा आहे. दिल्लीकडे येणाऱ्या वाहतुकीवर नियंत्रण, सीमावर्ती भागांत तपासणी, बस आरक्षणाची पडताळणी आणि संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त अशा उपाययोजनांची चर्चा आहे. जंतर-मंतर परिसरात उंच बॅरिकेड्स, अश्रुधूर वाहने आणि बॉडीकॅमसह पोलीस कर्मचारी तैनात केल्याचेही सांगण्यात आले आहे. संभाव्य आंदोलकांना ताब्यात घेतल्यानंतर ठेवण्यासाठी तात्पुरत्या छावण्यांची व्यवस्था करण्यात आल्याचा दावा आहे. मात्र, रेल्वेगाड्या रद्द करणे, ४५ मेट्रो स्थानकांवरील प्रवेश-निर्गमन बंद करणे आणि विद्यार्थ्यांना आंदोलनापासून दूर ठेवण्यासाठी शैक्षणिक संस्थांशी संपर्क साधणे, या दाव्यांची स्वतंत्र अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे. बॅरिकेड्सपलीकडेही आंदोलनाचा आवाज? दिल्लीतील कडक बंदोबस्तामुळे आंदोलकांना जंतर-मंतरपर्यंत पोहोचण्यात अडथळे आल्याचे सांगितले जात आहे. काही ठिकाणी पोलिस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष झाल्याचा, तसेच आकाशवाणी भवनाजवळ बॅरिकेड्स तोडणे आणि दगडफेकीच्या घटनेत दोन पोलीस कर्मचारी जखमी झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या घटनांबाबत अधिकृत पोलीस निवेदन आणि स्वतंत्र वृत्तस्रोतांकडे पुष्टी होणे महत्त्वाचे आहे. दरम्यान, मुंबई, पुणे आणि नाशिकसह महाराष्ट्रातील काही शहरांतही नागरिक रस्त्यावर उतरल्याचे वृत्त असल्याचा दावा करण्यात येत आहे. जनरेशन झेडमधील तरुण, विद्यार्थी संघटना, वकील आणि सामाजिक संघटनांचा सहभाग हा या आंदोलनाचा महत्त्वाचा पैलू ठरत असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. निवडणूक प्रक्रियेवरील विश्वासाचा प्रश्न ऐरणीवर मतदार याद्यांमधील कथित त्रुटी, एसआयआर प्रक्रियेतील पारदर्शकता आणि निवडणूक यंत्रणेची निष्पक्षता हे मुद्दे लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करून सीजेपीने आंदोलनाची भूमिका स्पष्ट केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या आरोपांबाबत संबंधित संस्थांची अधिकृत भूमिका, उपलब्ध पुरावे आणि निवडणूक प्रक्रियेतील प्रत्यक्ष त्रुटी यांची पडताळणी केल्याशिवाय अंतिम निष्कर्ष काढता येणार नाही. राजधानीतील सुरक्षा व्यवस्था आणि आंदोलनाचा अधिकार यांच्यातील समतोल, आंदोलकांना ताब्यात घेण्यामागील कायदेशीर आधार आणि निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे आता महत्त्वाची ठरणार आहेत. आंदोलनाला किती व्यापक जनसमर्थन मिळाले, ताब्यात घेतलेल्यांची अधिकृत संख्या किती आणि प्रशासन या आरोपांना काय उत्तर देते, यावर या घडामोडींचे पुढील राजकीय चित्र अवलंबून राहील. संपादकीय नोंद : वरील मजकूर उपलब्ध माहितीनुसार वृत्तपत्रीय शैलीत तयार केला आहे. चार हजार जणांना ताब्यात घेतल्याची संख्या, माजी मुख्यमंत्र्यांच्या ताब्याचा दावा, ३८ हजार पोलिसांचा बंदोबस्त, रेल्वे-मेट्रोवरील निर्बंध आणि दगडफेकीची घटना यांना प्रकाशनापूर्वी अधिकृत पोलीस निवेदन व विश्वसनीय वृत्तस्रोतांच्या आधारे पडताळावे.

### वाळू तस्करांच्या हल्ल्यात दोन वनरक्षक जखमी

वाघुळकर, वनपाल सचिन शिंदे, वनरक्षक सुरेश भोसले, अर्जुन खेडकर, पोलीस शिपाई भगीरथ पंचमुख व चालक अक्षय ससे यांचे पथक काल, शुक्रवारी रात्री ११:३० वा. कोळगावथडी येथील वनक्षेत्रात कारवाईसाठी गेले होते. गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळूची साठवणूक व वाहतूक करणारा ट्रॅटर पथकाने पकडल्याची माहिती आरोपींनी कळताच ३५ ते ४० जणांनी वन कर्मचाऱ्यांचा रस्ता अडवत लोखंडी रॉड, लाकडी काठ्या आणि कोयत्यांनी शासकीय वाहनावर हल्ला करून तोडफोड केली तसेच कर्मचाऱ्यांना जिवे मारण्याची धमकी देऊन शासकीय कामात अडथळा आणला. आरोपींनी शासकीय वाहनाची तोडफोड करत जप्त केलेला ट्रॅटर आणि त्यातील १ ब्रास वाळू जबरदस्तीने पळवून नेली.

याप्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी दादासाहेब वाघुलकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून १४ आरोपींसह ३५ ते ४० अनोळखी इसमांविरुद्ध कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींवर भारतीय न्याय संहिता, सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा, भारतीय वन अधिनियम आणि महाराष्ट्र गौण खनिज कायद्यातील विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल झाला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, शिर्डीचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक संभाजी गायकवाड व सहाय्यक पोलीस निरीक्षक धरमसिंग सुंदरडे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## बिबट्याच्या हल्ल्यात शिरसाठ दांपत्य बचावले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** राहाता तालुक्यातील पाथरे बुद्रुक येथील शिरसाठ दांपत्य पाथरे कोल्हार रस्त्यावरून जात असताना बालंबाल बचावले. पाथरे येथील जगदीश दत्तात्रय शिरसाठ वय ३३वर्ष व त्यांच्या पत्नी सौ निकिता जगदीश शिरसाठ वय २६ वर्ष हे काही कामानिमित्त घरून कोल्हार कडे जात असताना पाथरे कोल्हार रस्त्यावर खर्डे पाटोळे वस्तीजवळ त्यांना रस्त्यावर मोटारसायकल च्या प्रकाशात दोन पिल्ले दिसले त्यांना वाटले ससेच आहे पण गाडी जवळ जाताच रस्त्याच्या कडेला दबा धरून बसलेल्या बिबट्याने मोटारसायकल वर हल्ला केला यात निकिता यांच्या पायाला नख्यांनी जखमा झाल्या. सदर घटना रात्री ७:३० वाजता घडली. परंतु प्रसंगावधान राखत ते त्या ठिकाणावरून सुखरूप गेले व राहाता बाजार समितीचे उपाध्यक्ष आण्णा पाटील कडु यांना कळविले.

**आण्णा पाटील कडु यांनी तात्काळ मानद वन्यजीव रक्षक विकास म्हस्के यांना सांगितली.**

माहिती मिळताच म्हस्के यांनी जखमी शिरसाठ कुटुंबाशी संपर्क करून वैद्यकीय उपचार घेण्यास सांगितले व अहिल्यानगर सिव्हिल हॉस्पिटल येथे जाण्यास सांगितले. व घटनेची माहिती अहिल्यानगर चे उपवनसंरक्षक अधिकारी धर्मवीर सालविठ्ठल, सहाय्यक उपवनसंरक्षक अधिकारी गणेश मिसाळ, कोपरगावचे वनपरिक्षेत्र अधिकारी मेहबूब शेख यांना माहिती देण्यात आली.

## दखल

### दलित समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपा कटिबद्ध : गायकवाड

**अहिल्यानगर :** शहरात भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश प्रमुख पदाधिकारी बैठक उत्साहात पार पडली. भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीत अनुसूचित जाती मोर्चाचे राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पक्षाची आगामी वाटचाल, ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न आणि केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून दलित समाजासाठी राबविण्यात आलेल्या विविध जनहितकारी निर्णयांवर सविस्तर चर्चा करत आगामी उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे झालेल्या या एकदिवसीय बैठकीची सुरुवात सकाळी दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी सुधीर जांभूळकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. यानंतर पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांचे व्हर्च्युअल (दूरदृश्य) प्रणालीद्वारे मार्गदर्शनपर भाषण झाले. सर्व पाहुण्यांचे स्वागत बैठकीचे आयोजक तथा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे राज्य उपाध्यक्ष मनेष साठे यांनी केले.

### शास्त्रीनगर रेल्वे भुयारी मार्गावर पथदिवे



**अहिल्यानगर :** शहरात कायमस्वरूपी व नियोजनबद्ध विकासकामे सुरू असून शहर विकसित होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. प्रभाग क्रमांक १७ मध्ये नगरसेवक मनोज कोतकर यांनी मूलभूत सुविधांपासून शास्त्रीनगर रेल्वे भुयारी मार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा केला आहे. या भुयारी मार्गावर रात्रीच्या वेळी अंधार असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, नगरसेवक मनोज कोतकर यांच्या स्थानिक विकास निधीतून येथे पथदिवे बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे केडगाव देवी परिसरातील रहिवासी, विद्यार्थी आणि प्रवाशांना सुरक्षित व जवळचा मार्ग उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.महानगरपालिका प्रभाग क्रमांक १७ मध्ये नगरसेवक मनोज कोतकर यांच्या स्थानिक विकास निधीतून शास्त्रीनगर रेल्वे भुयारी मार्गावरील पथदिवे बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

### नवरात्र उत्सवानिमित्त शहरात १५ ऑक्टोबरला दांडिया नाईटचे आयोजन

**अहिल्यानगर :** शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील जिव्हाळा ग्रुप आयोजित व महावीर ग्रुप प्रायोजित दांडिया नाईटचे गुरुवारी (दि.१५ ऑक्टोबर) संध्याकाळी टिळकरोड येथील नंदनवन लॉन येथे आयोजन करण्यात आले आहे. या दांडिया नाईटमध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिव्हाळा ग्रुपच्या अध्यक्षा अल्पना कासवा व सविता काळे यांनी केले आहे. महिलांनी एकत्र येऊन जिव्हाळा ग्रुपची मुहुर्तमेढ रोवली असून, या ग्रुपच्या माध्यमातून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविण्यात येत आहे. तर विविध सण-उत्सवात महिलांना एक व्यासपीठ निर्माण करुन देण्यासाठी ग्रुपचे कार्य सुरु आहे. या ग्रुपमध्ये जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला जोडल्या गेल्या आहेत. या दांडिया नाईटच्या कार्यक्रमात नवरात्रीनिमित्त विविध स्पर्धा रंगणार असल्याची माहिती अल्पना कासवा यांनी दिली.

### महिला शेतकरी प्रमाणपत्र' नोंदणी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**ढोरजळगाव :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा, २०२६' अंतर्गत सध्या ढोरजळगाव, गरड वाडी, मलकापूर ता. शेवगाव व परिसरात महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणी मोहिमेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला. गेल्या वर्षानुवर्षे शेतात काबाडकष्ट करूनही ७/१२ उताऱ्यावर नाव नसल्याने महिला अधिकृत शेतकरी म्हणून ओळखल्या जात नव्हत्या. मात्र, आता या विशेष प्रमाणपत्राच्या माध्यमातून गावातील प्रत्येक कष्टकरी महिलेला स्वतंत्र शेतकरी म्हणून अधिकृत कायदेशीर ओळख मिळणार आहे. नावावर जमीन नसली तरी प्रमाणपत्र मिळणार आहे. या योजनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांच्या नावावर स्वतःची शेती नसली, तरीही त्या जर प्रत्यक्ष शेतीकाम किंवा पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय यांसारखी पूरक कामे करत असतील, तर त्या या प्रमाणपत्रासाठी पात्र आहेत. या मोहिमेस तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळकृषी अधिकारी शीतल नागवडे, उपकृषी अधिकारी सुनील होडशीळ तसेच सहाय्यक कृषी अधिकारी सविता बडे यांनी पुढाकार घेत यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित महिलांची महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणी करून घेतली.

# यशस्वी जीवनासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा हवीच : मुम्मका सुदर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री






**अहिल्यानगर :** आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर प्रयत्नांची पराकाष्ठा हवीच. विद्यार्थ्यांनी मोठे ध्येय डोळ्यासमोर ठेवावे आणि ते पूर्ण करण्यासाठी अहोरात्र मेहनत करावी. तसेच या यशाकडे जाताना ज्यांनी आपली साथ दिली, त्या आई-वडिलांना आणि गुरुजनांना कधीही विसरू नये, असे भावनिक विचार जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी व्यक्त केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे माजी प्रमुख कार्यवाह स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्या जयंतीनिमित्त संस्थेतील सर्व शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन बोलत होते. यावेळी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, अशोक मुथा, गौरव फिरोदिया, प्रकाश गांधी, सुनंदाताई भालेराव, ॲड. गौरव मिरीकर, आशाताई फिरोदिया, भूषण भंडारी, मीनाताई बोरा, शैलेश मुनोत, हेमंत मुथा, पुष्पाताई फिरोदिया, संजय सपकाळ, रवींद्र बाकलीवाल, जालिंदर बोरुडे, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे प्राचार्य कैलास साबळे, अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलचे प्राचार्य प्रभाकर भाबड, रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य रवींद्र भांड यांच्यासह संस्थेच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया या वयातही मानसिक व शारीरिक दृष्ट्या सक्षमपणे संस्थेची सर्व जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहे. त्याबद्दल पोलिस अधीक्षकांनी त्यांचे कौतुक केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेत जवळपास १८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या पालकांना याबद्दल जागृत केले तर अहिल्यानगर हे कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत निश्चितच अव्वलस्थानी असेल. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या मायाजालापासून व व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

प्रास्तविक संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले. स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध उपक्रम राबवून संस्थेच्या शाळांना प्रगतीपथावर नेले.

# स्वप्न पाहण्यासाठीही पात्रता लागते : शरद तांदळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ स्वप्न पाहून चालत नाही, तर त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी जिद्द, चिकाटी, मेहनत आणि सातत्य आवश्यक असते. स्वप्न पाहण्यासाठीही पात्रता लागते आणि ती वाचन, ज्ञान व योग्य विचारांतून निर्माण होते. प्रत्येकाने वाचनाचा छंद जोपासावा, आपल्या क्षेत्राची निवड करून त्यात सातत्य ठेवावे, निर्णयक्षमता वाढवावी आणि वेळेचा सदुपयोग करावा. मोबाईलमध्ये वाया जाणारी ऊर्जा विधायक कामासाठी वापरावी, असे आवाहन उद्योजक व लेखक शरद तांदळे यांनी केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने माऊली संकुल येथे उद्योजक व लेखक शरद तांदळे यांच्या 'स्वप्न ते उद्योजक' मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला विद्यार्थी व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावल्याने माऊली संकुल हाऊसफुल झाले.

यावेळी तांदळे यांनी उद्योजकता, वाचन, वेळेचे नियोजन, व्यावसायिक ज्ञान, निर्णयक्षमता आणि यशस्वी जीवनासाठी आवश्यक असलेल्या गुणांवर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला महापौर ज्योतीताई गाडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, उद्योजक मोहनशेठ मानधना, उपायुक्त मेहर लहारे, नगरसेवक सुरेश बनसोडे, बाळासाहेब पवार, डॉ. सागर बोरुडे, करण कराळे, प्राध्यापक माणिकराव विधाते, साहेबराव सप्रे आदींसह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शरद तांदळे म्हणाले की, चिरीमिरी देऊन मिळविलेले यश क्षणिक असते. आपण जे शिकतो ते योग्य आहे की नाही, याचेही भान ठेवले पाहिजे. प्रत्येकाने वाचनाचा छंद जोपासावा. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, बौद्धिक पातळी उंचावते आणि विचार करण्याची क्षमता वाढते. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनचरित्र वाचले पाहिजे. त्यांच्या जीवनातील संघर्ष, धैर्य आणि स्वराज्य स्थापनेचा ध्यास यातून प्रेरणा मिळते. माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे विचारही प्रत्येकाने आत्मसात करावेत.आजच्या तरुण पिढीची मोठी ऊर्जा मोबाईलमध्ये खर्च होत आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे युवकांचा वेळ आणि कार्यक्षमता वाया जात असल्याची चिंता शरद तांदळे यांनी व्यक्त केली. महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, स्वप्न पाहणे ही यशाची पहिली पायरी आहे, तर ते प्रत्यक्षात उतरविणे ही दुसरी पायरी आहे. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर शून्यातूनही विश्व निर्माण करता येते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उद्योजक आशिष पोखरणा यांनी केले. सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी तर डॉ. सागर बोरुडे यांनी आभार मानले.

## कर्मयोगी आबासाहेब म्हणजे विश्वास, प्रेरणा व समाज परिवर्तनाचा अखंड प्रवाह : माजी प्राचार्य नवल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे हे विश्वास, प्रेरणा आणि समाज परिवर्तनाचा अखंड प्रवाह आहेत. त्यांच्या विचारांतून आणि कार्यातून आजही अनेकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडत आहेत, असे प्रतिपादन आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहातील माजी प्राचार्य अशोक नवल यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेवगाव येथे कर्मयोगी आबासाहेब काकडे यांचा ४८ वा पुण्यस्मरण सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य अशोक नवल होते.

यावेळी व्यासपीठावर आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्राचार्य डॉ. प्रा. लक्ष्मण बिटाळ, शिक्षण विभागप्रमुख श्रीमती वंदना पुजारी, अशोक आहेर, हरिश्चंद्र मडके, बापूसाहेब डमरे, डॉ. अश्विनी उगले, उपप्राचार्य अशोक तमनर, उपमुख्याध्यापक अनिल मगर, पर्यवेक्षिका मोहिनी बडधे, पंढरीनाथ पल्हारे, रवींद्र आगळे, शिवाजी पोटभरे उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांनी कर्मयोगी आबासाहेब काकडे यांना पुण्यस्मरण दिनानिमित्त विनम्र अभिवादन केले.माजी प्राचार्य अशोक नवल यांनी आपल्या मनोगतातून आबासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच कर्मयोगी आबासाहेब काकडे व स्वर्गीय निर्मलाताई काकडे यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती दिली.प्राचार्य डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आबासाहेबांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग तसेच त्यांचे सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान याविषयी माहिती दिली. शिक्षक प्रतिनिधी प्रा. प्रतिमा उकिर्डे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थी प्रतिनिधी कु. शुभ्रा म्हस्के, भावना घुले, चि .यश तांबे, श्रुती घुगे आणि साक्षी टाकळकर यांनी कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या जीवनकार्यावर अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य अशोक तमनर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अनिल जगताप यांनी तर ज्ञानेश्वर गरड यांनी आभार मानले.

## शालेय गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत : शिक्षणाधिकारी गायकवाड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सेवा संकल्प अभियान अंतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या कार्यालयात नगर शहरातील मुख्याध्यापकांची सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये नवनियुक्त मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला.

या सभेमध्ये गायकवाड यांनी शासनाच्या विविध योजना, विद्यार्थी लाभाच्या योजना, ऑनलाइन कामकाज, सेवा संकल्प अभियान, शाळाबाह्य परीक्षा, अन्नसुरक्षा मानके, स्वच्छ हरित विद्यालय, नशा मुक्त विद्यालय अशा विविध उपक्रमांची माहिती देऊन शाळांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत त्यासाठी मार्गदर्शन केले.

तसेच विस्तार अधिकारी सुरेश ढवळे अरुण पालवे, पवार यांनीही विविध उपक्रमांची माहिती दिली. या सहविचार सभेसाठी राज्य मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष सुनील पंडित, शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव बेरड, रयत शिक्षण संस्थेचे इन्स्पेक्टर बोडखे सर, मनपा शिक्षण मंडळाचे दादासाहेब नरवडे, कैलास गुंजाळ व शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य उपस्थित होते.

# नवजीवन विद्यालयाच्या दोन्ही कबड्डी संघांची जिल्हास्तरावर निवड!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या १७ व १९ वर्षे वयोगटातील मुलांच्या कबड्डी संघांनी तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. दोन्ही संघांनी अंतिम सामन्यांत प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजय मिळविल्याने विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

शेवगाव तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा दि. ८ ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विखे पाटील कॅम्पस, शेवगाव येथे पार पडल्या. या स्पर्धेत नवजीवन विद्यालयाच्या १७ वर्षे वयोगटातील संघाने त्रिमूर्ती विद्यालय, शेवगाव येथील संघाचा, तर १९ वर्षे वयोगटातील संघाने न्यू आर्ट्स कॉलेज, शेवगाव येथील संघाचा पराभव केला. अटीतटीच्या लढतीत दोन्ही संघांनी विजय मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळविला. आता हे दोन्ही संघ जिल्हास्तरावर शेवगाव तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने विजयी संघातील सर्व खेळाडू तसेच संघाचे मार्गदर्शक मेहमूद पठाण, शौकत पठाण, शिवाजी वाबळे आणि नवनाथ कुसळकर यांचे अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. रमेश खैरे, उपप्राचार्य जयराम नांगरे, पर्यवेक्षक मच्छिंद्र पानकर यांच्यासह शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या यशाबद्दल जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-नेचे अध्यक्ष मा. आ.डॉ. नरेंद्र घुले पाटील, सचिव मा. आ.चंद्रशेखर घुले पाटील, जि. प. मा. अध्यक्षा राजश्रीताई घुले पाटील, मा. सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील, प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, विजय काशीद तसेच ग्रामस्थांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# डेंग्यूमुक्त अहिल्यानगरसाठी नागरिकांनी स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारावी : आयुक्त यशवंत डांगे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**अहिल्यानगर :** आपल्या घराची आणि परिसराची स्वच्छता करण्यासाठी बाहेरून कोणी येईल, याची वाट न पाहता प्रत्येक नागरिकाने 'आपली स्वच्छता, आपली जबाबदारी' या भावनेतून पुढाकार घ्यावा. आपल्या गल्लीपासूनच पाणीसाठ्यांची तपासणी करून डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानात सहभागी व्हावे. यामुळे शहर स्वच्छ, सुंदर व हरित होण्याबरोबरच नागरिकांचे आरोग्यही निरोगी राहण्यास मदत होईल. महानगरपालिकेच्या या अभियानामुळे डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे, असे प्रतिपादन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमांतर्गत तोफखाना येथील दादासाहेब रूपवते शाळेत जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुक्त यशवंत डांगे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी केली. नागरिकांना डेंग्यूच्या प्रतिबंधासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. मुग्धा साताळकर, शाळेचे प्राचार्य प्रमोद सूर्यवंशी, प्राध्यापक जयंत गायकवाड, डॉ. वृषाली आरु, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. कंचन रच्चा, प्राध्यापक सुनील वाघमारे, पिंटू ढोणे यांच्यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले, डेंग्यू हा शब्द छोटा असला, तरी हा आजार जीवावर बेतू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे. पावसाळ्यात साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरतात. डेंग्यूचा डास स्वच्छ पाण्यात उत्पन्न होतो आणि दिवसा चावतो. त्यामुळे या आजाराविषयी नागरिकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने महानगरपालिकेच्या माध्यमातून 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियान राबविण्यात येत आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले हे अभियान कौतुकास्पद असून, यामुळे नागरिकांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होत आहे. डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी घराच्या परिसरात पाणी साचू देऊ नये, पाणीसाठ्यांची नियमित तपासणी करावी आणि स्वच्छतेबाबत जागरूक राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सृष्टी बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक सुनील वाघमारे यांनी केले, तर डॉ. कंचन रच्चा यांनी आभार प्रदर्शन केले.

## दखल

### ५४ बालकांच्या हृदयशस्त्रक्रिया मोफत

दगडूशेठ गणपती ट्रस्ट आणि बुधरानी हॉस्पिटलचा उपक्रम; ऊसतोड मजुरांच्या मुलांना दिलासा



**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि इनलॅक्स बुधरानी हॉस्पिटलच्या हृदयविकार विभागाच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील विविध जिल्ह्यांतील ५४ बालकांच्या हृदयशस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. यातील बहुतांश बालके ऊसतोड कामगारांची असून, या उपक्रमामुळे आर्थिक परिस्थितीमुळे उपचारांची चिंता असलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी प्रसारमाध्यम ंद्वारे बालकांच्या हृदयशस्त्रक्रियांसाठी आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार राज्याच्या विविध भागांतील पालकांनी ट्रस्टच्या कार्यालयात बालकांची नोंदणी केली. त्यानंतर बुधरानी हॉस्पिटलच्या वैद्यकीय तज्ज्ञांनी तपासणी करून शस्त्रक्रियेसाठी ५४ बालकांची निवड केली. नोंदणी झालेल्या बालकांच्या शस्त्रक्रियांसाठी ट्रस्टने अधिकृत पत्र देऊन आवश्यक व्यवस्था केली.

### कृषी विज्ञान केंद्र बारामतीला सर्वोत्कृष्ट पुरस्कार



**बारामती :** एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्र, बारामतीला 'सर्वोत्कृष्ट कृषी विज्ञान केंद्र पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. पुणे येथे २९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ दरम्यान झालेल्या नवव्या वार्षिक विभागीय कृषी विज्ञान केंद्र कार्यशाळेत हा सन्मान देण्यात आला. केंद्रप्रमुख डॉ. धीरज शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेत महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या राज्यांतील ८२ कृषी विज्ञान केंद्रांनी सहभाग घेतला. सलग तीन दिवस चाललेल्या या कार्यशाळेत सहभागी केंद्रांच्या कामकाजाचा आणि विविध उपक्रमांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला. या वेळी डॉ. धीरज शिंदे यांनी बारामती कृषी विज्ञान केंद्राच्या कार्याचे सादरीकरण केले. त्यानंतर केंद्राच्या कामगिरीची दखल घेत सर्वोत्कृष्ट कृषी विज्ञान केंद्र म्हणून गौरव करण्यात आला.या कार्यशाळेला भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे माजी उपमहासंचालक डॉ. पी. दास आणि डॉ. के. डी. कोकाटे, माजी कुलगुरू डॉ. एम. एम. अधिकारी, आयसीएआर-अटारी विभागीय केंद्र आठ, पुणेचे संचालक डॉ. एस. के. रॉय, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी. के. ससाणे आणि आयसीएआर-अटारी, पुणेचे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. शाकीर अली सय्यद उपस्थित होते.कृषी संशोधन, नवतंत्रज्ञानाचा प्रसार आणि शेतकऱ्यांपर्यंत कृषीविषयक ज्ञान पोहोचविण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र बारामतीकडून करण्यात येणाऱ्या कामाची या पुरस्काराच्या माध्यमातून दखल घेण्यात आली आहे. या यशाबद्दल एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार, विश्वस्त सुनंदा पवार आणि विष्णुपंत हिंगणे यांनी केंद्रातील अधिकारी, कर्मचारी, शेतकरी आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले.

### शिरूरमध्ये जुगार खेळणाऱ्या चौघांवर कारवाई

**शिरूर :** शहरातील जगदंब चायनिजच्या शेजारी पत्र्याच्या शेडच्या आडोशाला तीन पानी पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या चार जणांवर शिरूर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत १२ हजार ५५० रुपये रोख रकमेसह जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. ही कारवाई ७ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, शिरूर येथील जगदंब चायनिजच्या शेजारी पांढऱ्या रंगाच्या पत्र्याच्या शेडच्या आडोशाला काही जण तीन पानी पत्त्यांचा जुगार खेळत होते. पोलिसांनी घटनास्थळी कारवाई केली असता राहुल भाउसाहेब सोनवणे (वय २४), रोहन राजु पवार (वय १९), रविराज गोरख गव्हाणे (वय २८) आणि महादेव मच्छिंद्र मोरे (वय ३२, सर्व रा. शिरूर तालुका) हे जुगार खेळताना आढळले.पोलिसांनी त्यांच्याकडून १२ हजार ५५० रुपये रोख रक्कम, पत्त्यांचे दोन कॅट आणि एक बॉलपेन असा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ अ अंतर्गत गुन्हा क्रमांक ८८६/२०२६ दाखल करण्यात आला आहे. पोलीस कॉन्स्टेबल गणेश संभाजी गोसावी यांनी फिर्याद दिली असून, पोलीस उपनिरीक्षक मुळीक या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

# फळपीक विमा योजनेत नोंदणी करण्यासाठी पोर्टल सुरु

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना आंबिया बहार सन २०२६- २७ करिता द्राक्ष, मोसंबी, केळी, पपई, नारळ, संत्रा, अंजीर, आंबा व डाळिंब या पिकांसाठी सहभागी होण्यासाठी https://www.pmfby.gov.in या राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर विहित मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.

ही योजना पुणे जिल्ह्यात भारतीय कृषि विमा कंपनी लि. मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी द्राक्ष पिकासाठी १५ ऑक्टोबर, केळी, मोसंबी, पपई, नारळ पिकासाठी ३१ ऑक्टोबर, संत्रा, अंजीर पिकासाठी ३० नोव्हेंबर, आंबा पिकासाठी ३१ डिसेंबर २०२६ व डाळिंब पिकासाठी १४ जानेवारी २०२७ याप्रमाणे अंतिम मुदत राहील. ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. या योजनेत गारपीट या हवामान धोक्यासाठीचा सहभाग ऐच्छिक असून त्यासाठी अतिरिक्त विमा हप्ता आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होणार आहेत किंवा नाही याबाबत घोषणापत्र अंतिम मुदतीच्या सात दिवस अगोदर भरुन देणे आवश्यक राहील. योजनेत सहभाग नोंदवण्यासाठी अधिसूचित फळबागांचे प्रती शेतकरी कमीत कमी २० गुंठे व सर्व फळपिकांचे मिळून जास्तीत जास्त ४ हेक्टर इतके उत्पादनक्षम क्षेत्र मर्यादा आहे. एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग अथवा आंबिया बहारापैकी एकाच हंगामाकरिता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल. बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास अशा अर्जदारास पुढील किमान ५ वर्षे विमा योजनेचा लाभ मिळणार नाही अशी कार्यवाही कृषि विभागामार्फत करण्यात येईल.योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी अर्थात फार्मर आयडी, डिजिटल पीक सर्वेक्षण अंतर्गत फळपिकांची नोंद, आधार कार्ड, बँक खाते तपशील, जमीन धारणेचा ७-१२ उतारा, फळबागेचा जिओ टॅगिंग फोटो, भाडेपट्ट्याने शेती करणाऱ्यास नोंदणीकृत भाडेकरार आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा अथवा https://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असेही कळविण्यात आले आहे.

## कांदा चाळीत काजळीचा प्रादुर्भाव; शेतकरी चिंतेत

वाढत्या उष्णतेमुळे साठवलेल्या कांद्याचे नुकसान होण्याची भीती; प्रतवारी करून विक्रीवर भर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** कांद्याला चांगला बाजारभाव मिळेल, या अपेक्षेने चाळीत साठवून ठेवलेल्या कांद्याला काजळी लागण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. वाढती उष्णता, बदलते हवाम ान आणि तापमानातील चढ-उतार यामुळे कांद्याची गुणवत्ता खालावण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे अधिक दराच्या प्रतीक्षेत असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोर साठवलेला माल खराब होण्याचे संकट उभे राहिले आहे.

गेल्या काही दिवसांत कांद्याला तुलनेने चांगला बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांनी अधिक दराच्या अपेक्षेने कांदा चाळीत साठवला होता. मात्र, कांदा खराब होण्याची चिन्हे दिसू लागल्याने शेतकऱ्यांनी प्रतवारी करून खराब होण्याची शक्यता असलेला कांदा तातडीने विक्रीसाठी बाजारात पाठवण्यास सुरुवात केली आहे.



**चार हजार रुपये प्रतिक्विंटल दराची अपेक्षा :**

सध्या कांद्याला प्रतिक्विंटल सुमारे चार हजार रुपये दर मिळत असल्याचे उत्पादक शेतकरी सांगतात. भविष्यात आणखी चांगला भाव मिळेल, या आशेने कांदा साठवून ठेवला होता. मात्र, वाढत्या उष्णतेमुळे कांदा खराब होऊ लागल्याने अधिक दराच्या प्रतीक्षेत राहावे की नुकसान टाळण्यासाठी तातडीने विक्री करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे.कवठे येमाई येथील रोहिलवाडी परिसरातील कांदा उत्पादक विलासराव रोहिले यांनी सांगितले की, चाळीत साठवलेल्या कांद्याची नियमित पाहणी केली जात आहे. खराब होऊ लागलेला कांदा वेगळा काढून विक्रीसाठी पाठवला जात आहे. उष्णता वाढत असल्याने उर्वरित कांदाही खराब होण्यापूर्वी बाजारात पाठवण्याची वेळ आली आहे.

**उत्पादन खर्चासह नुकसानीची चिंता :**

एकीकडे उत्पादन, मजुरी आणि साठवणुकीचा खर्च वाढत असताना दुसरीकडे कांदा खराब होण्याचा धोका वाढला आहे. अपेक्षित बाजारभाव मिळण्याच्या आशेने साठवलेला कांदा वेळेआधी विकावा लागत असल्याने शेतकऱ्यांच्या नफ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर कांद्याची नियमित पाहणी, योग्य प्रतवारी आणि वेळेवर विक्री करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

## बोरीऐंदीत विविध शिबिरांचे आयोजन

शेतकरी महिला प्रमाणपत्रांसह आरोग्य तपासणी, नेत्रचिकित्सा शिबिरांना प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**यवत :** दौंड तालुक्यातील बोरीऐंदी येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत शेतकरी महिला प्रमाणपत्र नोंदणी, पीएम किसान योजना मार्गदर्शन, मोफत नेत्रचिकित्सा, आरोग्य तपासणी आणि विविध शासकीय योजनांच्या लाभासाठी मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात आले. सरपंच प्रज्ञा संदीप गायकवाड यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.

शेतकरी कुटुंबातील महिलांच्या योगदानाला अधिकृत मान्यता मिळावी, यासाठी आयोजित शिबिरात सुमारे ३९१ महिलांना शेतकरी महिला प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

तसेच मोफत नेत्रचिकित्सा शिबिरात सुमारे ३८८ नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. यापैकी ३५ नागरिकांवर मोतीबिंदूची शस्त्रक्रिया मोहम्मदवाडी येथील देसाई हॉस्पिटलमध्ये मोफत करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या उपक्रमासाठी कस्तुरी ग्रुपचे सहकार्य लाभले.महिलांसाठी एसटी प्रवासाकरिता एनसीएमसी स्मार्ट कार्ड शिबिराचे आयोजन करून कार्डचे वाटप करण्यात आले. मोफत आरोग्य तपासणी शिबिरात नागरिकांची रक्तदाब, मधुमेह आणि इतर शारीरिक तपासणी करण्यात आली. तसेच शासकीय योजनांची माहिती देऊन नागरिकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.गावाच्या विकासासाठी आणि नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सरपंच प्रज्ञा संदीप गायकवाड यांनी सांगितले. या कार्यक्रम ासाठी वैभव भागवत यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी ग्राम पंचायत सदस्य, शेतकरी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरांमुळे महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना लाभ मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## यंत्रयुगात बैलजोड्या दुर्मीळ; पोळ्यावर दुष्काळाचे सावट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दौंड :** आधुनिक शेतीत ट्रॅक्टर आणि विविध यंत्रांचा वापर वाढल्याने बैलजोड्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. एकेकाळी प्रत्येक शेतकऱ्याच्या गोठ्यात असणारी सर्जा-राजाची जोडी आता दुर्मीळ झाली असून, हौशी शेतकऱ्यांकडेच बैलजोड्या पाहायला मिळत आहेत. त्यातच यंदा पावसाने ओढ दिल्याने बैलपोळा सणावरही दुष्काळाचे सावट असून, शेतकऱ्यांमधील उत्साह कमी झाल्याचे चित्र दौंड तालुक्यात दिसत आहे.

पूर्वी नांगरणी, पेरणी, कोळपणी तसेच शेतीम ालाच्या वाहतुकीसाठी बैलजोडीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. शेतात वर्षभर राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा म ोठ्या उत्साहात साजरा केला जात असे. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना नदी, नाले किंवा उपलब्ध पाण्यात स्वच्छ धुऊन त्यांची खांदेमळणी केली जात असे. त्यांच्या शिंगांना रंग लावून, अंगावर रंगरंगोटी करून झुली आणि फुलांनी सजविले जात असे.



पोळ्याच्या दिवशी सजविलेल्या बैलांची वाजतगाजत मिरवणूक काढून मारुती मंदिराला प्रदक्षिणा घातली जात असे. त्यानंतर घरी बैलांची पूजा करून त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जात असे. या परंपरेतून शेतकरी आणि बैल यांच्यातील अतूट नाते अधोरेखित होत असे.मात्र, आधुनिक शेतीत वेळ आणि श्रम वाचविण्यासाठी नांगरणी, पेरणी, मशागत आणि वाहतुकीसाठी ट्रॅक्टर व अन्य यंत्रांचा वापर वाढला आहे. त्यामुळे बैलजोडी सांभाळण्याची गरज कमी झाली असून, गोठ्यातील बैलांची संख्या सातत्याने घटत आहे. परिणामी, बैलपोळ्याच्या उत्सवाचे स्वरूपही बदलत चालले आहे.काही हौशी शेतकरी आजही बैलजोड्या जपत परंपरेनुसार पोळा साजरा करतात. आधुनिक यंत्रांच्या युगात शेतीतील बैलांचे महत्त्व कमी झाले असले, तरी शेतकऱ्यांच्या जीवनात मोलाची साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी बैलपोळ्याची परंपरा आजही कायम आहे. यंदा मात्र पावसाच्या कमतरतेमुळे सणाच्या उत्साहावर मर्यादा आल्याचे चित्र आहे.

## चनाम्याची मुदत संपली तरी शेतकरी वंचित राहणार नाहीत

आमदार राहुल कुल यांची ग्वाही; गरज पडल्यास मुदतवाढीसाठी शासनाकडे मागणी करणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**दौंड :** परतीच्या पावसाने दडी मारल्याने आणि वाढत्या उष्णतेमुळे दौंड तालुक्यात दुष्काळी परिस्थिती गंभीर झाली आहे. खरीप पिकांचे नुकसान झाले असून रब्बीच्या पेरण्यांवरही संकट निम र्ण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पीक नुकसानीच्या पंचनाम्यांची मुदत १२ ऑक्टोबरला संपत असली, तरी तालुक्यातील एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही आम दार राहुल कुल यांनी दिली.

पावसाअभावी अनेक भागांतील पिकांचे मोठ्या प्रम ाणावर नुकसान झाले आहे.



**शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होऊ नये आणि प्रत्येक बाधित शेतकऱ्याला न्याय मिळावा यासाठी आमदार राहुल कुल यांनी स्वत: या प्रकरणात मध्यस्थी करावी, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून पंचनाम्यांची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.**

मात्र, पंचनाम्यांसाठी दिलेली मुदत अपुरी पडत असून तांत्रिक अडचणी, कर्मचाऱ्यांची कमतरता तसेच इंटरनेट आणि सर्व्हरच्या समस्यांमुळे काही ठिकाणी पंचनामे वेळेत पूर्ण होऊ शकलेले नाहीत. त्यामुळे प्रशासनाने उर्वरित पंचनामे तातडीने पूर्ण करण्याची गरज असल्याचे कुल यांनी सांगितले.

## अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराचा निषेध; आरोपीला कठोर शिक्षेची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** पुण्यातील विशांतवाडी परिसरात अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेचा निषेध करत आरोपीला कठोर शिक्षा द्यावी आणि पीडितेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या शिरूर तालुका कार्यकारिणीच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांना निवेदन देण्यात आले.



विशांतवाडी परिसरात घडलेल्या या गंभीर घटनेमुळे समाजमन हेलावून गेले आहे. आरोपीवर पोक्सो कायद्यासह संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी. तसेच पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबीयांना संरक्षण द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

या वेळी महाराष्ट्र नाभिक म हामंडळाचे शिरूर तालुका अध्यक्ष रामदास जाधव, सचिव दत्तात्रय शिंदे, सहसचिव दिगंबर घायतडक, उपाध्यक्ष गोपाळ बंड, पश्चिम महाराष्ट्र विभागीय उपाध्यक्ष गणपत क्षीरसागर, संतोष शिंदे, गोरख गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, सनी थोरात, प्रितेश फुलडाळे, दादासाहेब साळुंके, अमोल जाधव आणि राजेंद्र आतकर उपस्थित होते.

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते कि, खालिल परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक हे **१) अंजना बाळासाहेब हरपळे २) विशाल बाळासाहेब हरपळे ३) परमेश्वर बाळासाहेब हरपळे ४) गुलाब दत्तात्रय हरपळे ५) कैलास दत्तात्रय हरपळे** हे असुन त्यांनी सदर मिळकत आमचे यांना सदरची मिळकत खरेदी देण्याचे ठरवुन, त्यासंदर्भात अंतिम बोलणी होवून विसार देखील स्विकारून तसा दस्त देखील लिहून व नोंदवुन ठेवलेला आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निंजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा सदर मालकाने आमच्या अशीलांस दिला आहे. तरी सदर मिळकती मध्ये अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, पोटगी, चोळी, बांगडी, कोर्ट डिक्री दावा, कुळ ताबा, वहिवाट वारसा हक्क, साठेखत, खरेदीखत, करार, मदार, विसार, जप्ती अगर अन्य स्वरूपाचा कोणताही हक्क असल्यास संबंधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ (सात) दिवसांच्या आतमध्ये खालील पत्यावर अस्सल कागदपत्रासह प्रत्यक्ष हजर राहून आमची खात्री पटवुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कसलीही, हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. किंवा संबंधीतानी त्यांचे अस्सल हक्क व हितसंबंध अधिकार जाणिव पुर्वक सोडून दिलेला आहेत असे समजुन आमचे अशील पुढील व्यवहार पुर्ण करतील. नंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन: -** तुकडी पुणे पोट तुकडी तालुका हवेली तसेच मा. सह दुय्यम निबंधक हवेली नगरपरिषद पुणे यांचे हद्दीतील गाव मौजे फुरसुंगी ता. हवेली, जि. पुणे येथील मिळकत यांसी स. नं. १४५ हिस्सा नं. १ यांसी क्षेत्र ०५ हे २४ आर अधिक पोट खराबा ०० हे ०२ आर असे एकुण क्षेत्र ०५ हे २६ आर यांसी आकार २० रू. ४४ पैसे पैकी विद्यमान मालक यांच्या सामाईक मालकीचे आमचे अशिल यांना खरेदी देण्याचे ठरलेले क्षेत्र ०० हे १० आर ही मिळकत यांसी चतु:सिमा पुढील प्रमाणे पुर्वेस: रावसाहेब विलास हरपळे यांची मिळकत., दक्षिणेस: याच सर्वे नंबर पैकी उर्वरित मिळकत., पश्चिमेस: २० फुटी रूंदीचा सामाईक रस्ता. उत्तरेस: नरेश भगवानदास सिंधवाणी यांची मिळकत.

पुणे

दिनांक: 10/10/2026

**ॲड.पंकज चंद्रकांत लडकत**
ऑफिस : J 106-107, मेगा सेंटर, हडपसर, पुणे – 411013
मो: 9850661700, 9921666710

## महिला पोलीस शिपाई ते एएसआय; शबनम पठाण-बेग यांचा प्रेरणादायी प्रवास

# जिद्द, मेहनत आणि कर्तव्यनिष्ठेच्या बळावर मिळवले यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर :** लहानपणापासून पोलीस खात्यात जाण्याचे स्वप्न उराशी बाळगून खाकी वर्दी परिधान करण्याची इच्छा पूर्ण करणाऱ्या करंजेपूल, ता. बारामती येथील शबनम पठाण-बेग यांनी महिला पोलीस शिपाई पदापासून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) पदापर्यंत मजल मारली आहे. प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी मिळवलेले यश ग्रामीण भागातील तरुणी आणि महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

शबनम पठाण-बेग यांनी सोमेश्वर विद्यालय, सोमेश्वरनगर येथे शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर मु. सा. काकडे महाविद्यालयात उच्च शिक्षण घेतले. शिक्षण घेत असतानाच पोलीस सेवेत जाण्याचे ध्येय त्यांनी निश्चित केले होते. अथक परिश्रम आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांतून त्यांनी पोलीस भरतीत यश मिळवत महिला पोलीस शिपाई म्हणून सेवेला सुरुवात केली.



पोलीस सेवेत काम करताना त्यांनी पुणे ग्रामीण जिल्हा विशेष शाखा, वाहतूक शाखा आणि आर्थिक गुन्हे शाखेत विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. या काळात विविध गुन्ह्यांच्या तपासात आणि महत्त्वाच्या गुन्ह्यांची उकल करण्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीची जाणीव या गुणांच्या बळावर त्यांनी आपल्या कामाची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या कार्याची दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांना २५६ वेळा सन्मानित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

महिला पोलीस शिपाई पदापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आता सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंत पोहोचला आहे. सध्या त्यांची नेमणूक पुणे येथील आर्थिक गुन्हे शाखेत आहे.

या यशामागे स्वतःची मेहनत आणि जिद्द यांसोबतच पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि सहकाऱ्यांचे सहकार्य महत्त्वाचे ठरल्याचे शबनम पठाण-बेग यांनी सांगितले. प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करणे, वरिष्ठांचे मार्गदर्शन घेणे आणि कोणत्याही परिस्थितीत ध्येयापासून विचलित न होणे, हेच आपल्या प्रवासाचे बळ असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यातही पोलीस खात्यात निष्ठेने सेवा बजावत आणखी मोठ्या पदावर पोहोचण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

त्यांचा हा प्रवास ग्रामीण भागातील युवक-युवती आणि महिलांसाठी प्रेरणादायी आहे. जिद्द, मेहनत आणि सातत्य यांच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ध्येय साध्य करता येते, हे शबनम पठाण-बेग यांनी आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिले आहे.

# बाभुळवाडे जि.प. शाळेची इमारत धोकादायक

## २० आदिवासी विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज** : पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे येथील जि. प. प्राथ. शाळेच्या जीर्ण इमारतीचा पाया सुमारे दोन फूट खचल्याने २० आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

सुमारे ३० वर्षांपूर्वी उभारलेली पत्र्याची ही शाळा सध्या धोकादायक अवस्थेत असून, दुसरीकडे मागील चार महिन्यांपासून केवळ एकाच शिक्षकावर सर्व वर्गांची जबाबदारी असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवरही परिणाम होत आहे. शाळेची तातडीने दुरुस्ती करावी आणि अतिरिक्त शिक्षकांची नेमणूक करावी, अशी मागणी ग्रामस्थ व आदिवासी बांधवांकडून होत आहे.

**पाया खचला; दुर्घटनेची भीती**

बाभुळवाडे येथील डोंगर उतारावरील आदिवासी वस्तीमध्ये सुमारे ३५० लोकवस्ती असून, येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कार्यरत आहे. मात्र, सुमारे तीस वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या शाळेच्या इमारतीची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. इमारतीचा पाया दोन फूट खचल्याने भिंतींच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना शाळेत बसावे लागत असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन इमारतीची पाहणी करावी व आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

**एकाच शिक्षकावर सर्व वर्गांचा भार**

इमारतीच्या समस्येबरोबरच शाळेत शिक्षकांची कमतरताही गंभीर बनली आहे. मागील चार महिन्यांपासून केवळ एकच शिक्षक कार्यरत असल्याने सर्व वर्गांना शिकविण्याची



जबाबदारी त्यांच्यावर पडत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ देणे, अभ्यासक्रम पूर्ण करणे आणि शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देणे यामध्ये अडचणी निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी रिक्त पदावर तातडीने शिक्षकाची नियुक्ती करण्याची गरज व्यक्त होत आहे.

**पाहणी दौऱ्यात ग्रामस्थांनी मांडल्या व्यथा**

या शाळेला 'आपलं गाव फाउंडेशन'चे अध्यक्ष डॉ. सुरेश खणकर, माजी सरपंच भिवाजी जगदाळे आणि सामाजिक कार्यकर्ते गणेश कदम यांनी नुकतीच प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी ग्रामस्थ व आदिवासी बांधवांनी शाळेच्या इमारतीची दुरवस्था आणि शिक्षकांच्या कमतरतेमुळे निर्माण झालेल्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. गंभीर केदार, अजय चिकणे, पिनाकी चिकणे, साहेबराव चिकणे यांच्यासह अनेक ग्रामस्थ व आदिवासी बांधव यावेळी उपस्थित होते.

प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी

शाळेच्या इमारतीची तातडीने दुरुस्ती अथवा आवश्यकतेनुसार नव्याने बांधकाम करावे, तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी अतिरिक्त शिक्षकाची त्वरित नियुक्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी आणि शिक्षणाशी संबंधित या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या**

धोकादायक शाळा इमारतीची तातडीने पाहणी करून पक्की दुरुस्ती अथवा पुनर्बांधणी करावी.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी अतिरिक्त शिक्षकाची त्वरित नियुक्ती करावी.

# शिक्षणातून परिवर्तन घडविणारे शिक्षणमहर्षी आबासाहेब काकडे : शेळके

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगाव** : शिक्षणाच्या माध्यमातून गोरगरीब, दीन-दलित आणि वंचित घटकांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे स्वप्न पाहणारे आबासाहेब काकडे होते. असे प्रतिपादन मारुती शेळके यांनी बोलताना व्यक्त केले. कर्मयोगी आबासाहेब उर्फ कान्होजी जगन्नाथ काकडे यांचा ४८ वा पुण्यस्मरण सोहळा शुक्रवारी (दि. ९ ऑक्टोबर) श्रीराम माध्य व उच्च माध्य विद्यालयात संपन्न झाला. त्यावेळी शेळके बोलत होते. प्रास्ताविकात प्राचार्य संजय चेमटे म्हणाले की 'भागुजी ते जगन्नाथ आणि जगन्नाथ ते कर्मयोगी आबासाहेब' हा त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास होता नामवंत वकील म्हणून लौकिक मिळविल्यानंतरही स्वतःपुरते यश मर्यादित न ठेवता त्यांनी ग्रामीण, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आयुष्य समर्पित केल्याचे त्यांनी नमूद केले. श्रीराम




विद्यालयाच्या ६६ वर्षांच्या शैक्षणिक परंपरेतून असंख्य विद्यार्थ्यांना घडण्याची संधी मिळाली, असेही त्यांनी सांगितले. ताजनापूर लिफ्ट सिंचन योजनेच्या माध्यमातून पाण्याचा प्रश्न सोडविण्याचे आबासाहेबांचे अपूर्ण स्वप्न ॲड. डॉ. विद्याधर काकडे आणि हर्षदाताई काकडे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

नवनाथ गीते म्हणाले की आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे पहिले विद्यालय म्हणजे श्रीराम विद्यालय असल्याचे सांगून, शेतकरी आणि गोरगरीब कुटुंबांतील मुलांनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे, ही आबासाहेबांची तळमळ होती.

यावेळी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ शिक्षक सुधाकर आल्हाट, तसेच अहिल्यानगर गणित अध्यापक मंडळाचा जिल्हा गुणवंत गणित अध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल संजय पवार यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी पर्यवेक्षिका सुरेखा शेलार, पालक प्रतिनिधी डॉ.देविदास देशमुख, सुरेश तेलोरे, शंकर खोले, सुधाकर आल्हाट, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूनम वाबळे आणि रत्नमाला फलके यांनी केले तर संस्था प्रतिनिधी सुरेश तेलोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# भातकुडगाव फाट्यावर आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगावः** भातकुडगाव इरिगेशन कॉलनीअंतर्गत अपूर्ण असलेले मायनरचे भरणे १८ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी जोहरापूर, लोळेगाव, सामणगाव, भातकुडगाव आणि आखतवाडे परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. निर्धारित मुदतीत पाणी उपलब्ध न झाल्यास भातकुडगाव फाटा येथे तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

यासंदर्भात मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. मायनरचे उर्वरित काम अपूर्ण असल्याने परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. वेळेत पाणी न मिळाल्यास उभी पिके धोक्यात येण्याची शक्यता असून, आर्थिक



संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी वाढणार आहेत.

या पाणीप्रश्नाबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. पाटबंधारे विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून मायनरचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करावे. तसेच पाणीवाटपाचे योग्य नियोजन करून कालव्याच्या अंतिम टप्प्यातील शेतकऱ्यांनाही सिंचनासाठी पाणी मिळेल, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीसाठी पाणी अत्यंत महत्त्वाचे असताना विभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन मुदतीत कार्यवाही करावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

या निवेदनावर सरपंच रोहन दिलीपराव लांडे, अशोक देवढे, एकनाथ काळे, संदीप बामदळे, आजिनाथ उगलमुगले, गोरक्षनाथ गरजे, नंदू मुसबत, दादासाहेब देवढे, अशोक पंडित, अशोक घुमरे, एकनाथ घुमरे, महादेव वने, योगेश थोरे यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**१८ ऑक्टोबरपर्यंत पाणी द्या, अन्यथा आंदोलन**

शेतकरी सिंचनाच्या पाण्यासाठी संघर्ष करत असताना पाटबंधारे विभागाकडून समाधानकारक कार्यवाही होत नसल्याची आमची तक्रार आहे. १८ ऑक्टोबरपर्यंत पाणी उपलब्ध झाले नाही, तर भातकुडगाव फाटा येथे तीव्र आंदोलन करण्यात येईल.

**- रोहन दिलीपराव लांडे, सरपंच, जोहरापूर**

## कोरडगावात मावा विक्री जोरात अन् तरुणाईचे आरोग्य धोक्यात !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव** : राज्यात आणि जिल्ह्यात एकात्मिक अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर कडक बंदी असताना, कोरडगाव आणि परिसरात सध्या 'मावा' या घातक पदार्थाची राजरोस आणि बेकायदेशीर विक्री जोमात सुरू असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, शालेय परिसर आणि गल्लीबोळांतील टपऱ्यांवरून हा जीवघेणा माल सहज उपलब्ध होत असल्याने अल्पवयीन मुले व तरुण पिढी व्यसनाधिनतेच्या विळख्यात अडकत चालली आहे.

स्थानिक प्रशासनाच्या मूक संमतीमुळे किंवा दुर्लक्षांमुळे अवैध विक्रेत्यांचे धाडस वाढले असून, खुलेआम सुरू असलेल्या या धंद्यामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**आरोग्याशी खेळ, पालकांमध्ये चिंता**

मावा बनवण्यासाठी वापरली जाणारी निकृष्ट दर्जाची सुपारी, तंबाखू आणि रासायनिक सुवासिक द्रव्ये मानवी शरीरासाठी अत्यंत घातक असतात. यामुळे तोंडाचा कर्करोग (कॅन्सर), हिरड्यांचे आजार आणि पचनसंस्थेचे गंभीर विकार जडतात. कोरडगाव बोधेगाव रोडवर,दवाखाने,हॉटेल्स,खाद्य पदार्थांचे दुकाने अनेक शाळा-महाविद्यालयांच्या परिसराजवळ पानटपऱ्यांवर हा विषारी पदार्थ सहज मिळत असल्याने विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात चालले आहे. दिवसाढवळ्या सुरू असलेल्या या प्रकारामुळे संतप्त पालकांनी चिंता व्यक्त केली असून, ''आमची मुले नेमक्या कोणत्या दिशेने चालली आहेत?'' असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**प्रशासन कारवाई कधी करणार?**

अन्न व औषध प्रशासन (ऋृअ) आणि स्थानिक पोलिसांच्या हद्दीत हा अवैध धंदा फोफावत असला, तरी कारवाईच्या नावाखाली केवळ खानापूर्ती केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. दंडात्मक कारवाई किंवा धडक मोहिमेचा अभाव असल्यामुळे विक्रेत्यांचे फावले आहे.

कोरडगाव परिसरात सुरू असलेली ही मावा विक्री तातडीने थांबवून, संबंधित टपऱ्यांवर आणि घाऊक विक्रेत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी सजग नागरिकांमधून व पालकांकडून होत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

# पाणी अर्ज दाखल करा, टंचाईचा सामना करण्यासाठी सज्ज व्हा : शिवाजी डेरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोजः** राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पाणी अर्ज दाखल करावेत. थकीत पाणीपट्टी भरून पाणी वापर संस्थांना सहकार्य करावे, असे आवाहन शिवनेरी वितरिका स्तरीय पाणी वापर महासंघाचे अध्यक्ष शिवाजीराव डेरे यांनी केले.

निघोज येथील कुकडी कॉलनीत दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई, कुकडी डावा कालवा आणि रब्बी आवर्तनाबाबत चर्चा करण्यासाठी महासंघाच्या वतीने बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पाटबंधारे विभागाचे अधिकारी, पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी, संचालक आणि शेतकरी उपस्थित होते. बैठकीला शंभरहून अधिक जणांनी सहभाग नोंदविला.

पारनेर तालुक्यात प्रत्यक्षात सुमारे साडेसतरा



हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची क्षमता असताना, पाणी अर्जांअभावी केवळ तीन हजार हेक्टर क्षेत्राला पाणी मिळत असल्याची बाब बैठकीत मांडण्यात आली. सध्या सहा दिवसांच्या आवर्तनात केवळ दीड दिवस पाणी मिळत असल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण होत आहेत. शासनाकडून पाणीवापरावर निर्बंध येण्याची शक्यता लक्षात घेता, शेतकऱ्यांनी पाण्याची मागणी नोंदविणे आवश्यक असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

पाणी वापर संस्था या शेतकऱ्यांच्या मातृसंस्था आहेत. त्या सक्षम झाल्यास पाणी व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल. पाणी अर्जांमुळे चाऱ्यांची दुरुस्ती आणि इतर आवश्यक कामांना गती मिळू शकते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पाटबंधारे कामांसाठी निधी उपलब्ध होत असून, त्याचा लाभ घेण्यासाठी शेतकरी आणि संस्थांमध्ये समन्वय आवश्यक असल्याचे डेरे यांनी नमूद केले. पाटबंधारे विभागाचे अधिकारी रावसाहेब दाते यांनी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी विभाग सक्षम असल्याचे सांगत शेतकऱ्यांनी पाणी अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले. बैठकीस महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष झिंजाड, विश्वनाथ येवले, नवनाथ सालके, ॲड. बाळासाहेब लामखडे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**चौकट : नाना पाटेकर यांना श्रद्धांजली**

बैठकीपूर्वी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी राज्यातील अनेक शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत करून आधार दिला, असे ज्येष्ठ मार्गदर्शक ॲड. बाळासाहेब लामखडे यांनी सांगितले.

द•ख•ल

## तुटपुंज्या मानधनामुळे अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

**टाकळी ढोकेश्वर** : राज्यातील २३८८ अनुदानित वसतिगृहांमधील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या तुटपुंज्या मानधनामुळे आणि शासनाकडून होत असलेल्या फसवणुकीच्या निषेधार्थ १९ऑक्टोबर २०२६ पासून कर्मचा-यांनी बेमुदत संप पुकारला आहे. याच काळात राज्यभर प्रथम सत्र परीक्षा सुरू होत असल्याने या वसतिगृहांमध्ये राहून शिक्षण घेणाऱ्या सुमारे एक लाख मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांची काळजी घेण्यासाठी अधीक्षक,स्वयंपाकी, मदतनीस आणि चौकीदार असे चार कर्मचारी कार्यरत असतात.त्यांना अनुक्रमे १००००, ८५०० आणि ७५०० रुपये (मदतनीस व चौकीदार प्रत्येकी) इतक्या तुटपुंज्या मानधनावर २४ तास काम करावे लागते. अलीकडेच अनुदानित आश्रमशाळा संलग्न वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. मात्र, पुणे येथील समाजकल्याण आयुक्तांनी या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचा प्रस्ताव सादर करूनही शासनाने तो फेटाळला. पगारवाढीच्या प्रतीक्षेत अनेक कर्मचारी निवृत्त झाले असून काहींनी आत्महत्याही केल्या आहेत.आता शासनाचा हा निर्णय सहन न करता कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले आहे. या संपामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. तसेच सकारात्मक निर्णय होईपर्यंत हा संप मागे घेतला जाणार नाही असे युनियनचे अध्यक्ष नागसेन पवार यांनी स्पष्ट केले आहे.

## नवरात्र उत्सत्वानिमित्त सतोंषी माता मंदीर येथे विविध धार्मिक कार्यक्रम.

**ढोरजळगांव** : शेवगांव तालुक्यातील आव्हाणे बु येथील नवसाला पावणारी संतोषी मातेचे भव्यदिव्य मंदीर आसुन नवरात्र उत्सव काळात येथे भाविक भक्तांची मोठी वर्दळ पाहण्यास मिळते.रविवार ११ आक्टोबर ते मंगळवार २० ऑक्टोबर नवरात्र उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सतोंषी मातेची आख्ययिका आशी सांगितली जाते की आव्हाणे बु येथील रहिवाशी व पुणे येथील व्यावसायिक सुभाष बोथरा ,शरद बोथरा ,व रवि बोथरा , व यांच्या आई शांताबाई बोथरा यांनी २५ वर्षापुर्वी केलेल्या नवसाची पुर्ती म्हणुन स्वखर्चाने सतोंषी मातेच्या मंदीराची बांधणी केली होती मंदीराचा नुकताच १०लक्ष रूपये खर्चुन मंदीराचे बांधकाम करण्यात आहे. तसेच सुभाष बोथरा यांच्या स्वखर्चातुन २ लाख रूपये खर्चाच्या सभामंडपाचे भरीव काम पुर्ण झाले आहे.आव्हाणे बु निद्रिस्त गणपती शेजारीच हे मंदीर बांधण्यात आले असुन दरवर्षी नवरात्र उत्सवात या ठिकाणी नऊ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## दुष्काळी स्थिती लक्षात घेता एकल महिलांना प्रत्येकी ५० हजाराची मदत करा : सोनवणे

हातगाव :

चालू हंगामात पावसाळ्याचे चारही महिने कोरडे गेले असून कधी नव्हे एवढी भयाण परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे राज्य शासनाने राज्यातील २८५ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनाच थोड्याच दिवसात नुकसान भरपाई जाहीर होऊन ती शेतकऱ्याच्या खात्यात अदा होईल. मात्र राज्यातील असंख्य एकल महिला त्याचा काहीच फायदा होणार नसून राज्यातील अशा एकल महिलांना प्रत्येकी ५० हजाराचे अनुदान देण्यात यावे अशी प्रमुख मागणी साउ एकल महिला समिती समन्वयक तथा वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य प्रथम सोनवणे व स्त्री - शक्ती फाऊंडेशनच्या सचिव सौ. रंजना सोनवणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाडरे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पावसाळ्याच्या चालू हंगामात पावसाने पाठ फिरवली असल्याने शेतकऱ्यांनी पेरलेली सर्व पिके करपून गेली असून थोड्याच दिवसात मोठ्या संकटांना सामोरे जाण्याची वेळ प्रत्येक व्यक्तीपुढे येणार असून त्यातच राज्यात असणाऱ्या एकल महिलांना त्याचा मोठा त्रास सहन करण्याची वेळ येणार असल्याने अशा महिला वर्गाचा शासन स्तरावर गांभीर्याने विचार होणे गरजेचे असल्याने राज्यातील प्रत्येक एकल महिलांना ५० हजार रुपयांचे अनुदान जाहिर करून त्याची रक्कम त्यांच्या खात्यात तात्काळ देण्याची व्यवस्था करावी अशीही प्रमुख मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात प्रथम सोनवणे व रंजना सोनवणे आणि शेकटे खुर्द ग्रामपंचायतीचे सदस्य शंकर राठोड यांनी केली आहे.

## मोहटादेवी येथून ज्योत आणण्याकरता उंदीरगाव भाविक रवाना

**शिरसगाव** :श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथून मोहटादेवी पाथर्डी येथून नवरात्रमध्ये ज्योत आणण्याकरता श्री महारुद्र हनुमान मंदिर सेवेकरी वर्ग मित्रमंडळ सेवेकरी सालाबाद प्रमाणेउंदीरगाव येथून सायंकाळी शुक्रवारी रवाना झाले राजेंद्र बांद्रे संतोष वाकचौरे योगेश रोकडे नितीन निपुंगे विजय सोमवंशी अक्षय गायके ऋषिकेश जगताप हर्षद ताके मनोज वाकचौरे आकाश फुलवर अभिजीत गुंड वैभव भालदंड आदी रवाना झाले त्यांचे स्वागत उंदीरगाव ग्रामस्थ, सूर्योदय संस्थेचे संस्थापक दिलीप गायके बाळासाहेब निपुंगे चित्रसेन गलांडे अभिजीत गलांडे गौरव थोरात शरद आव्हाड बाबासाहेब जगताप व श्री महारुद्र हनुमान मंदिर सेवेकरी वर्ग मित्रमंडळ आदींनी केले.



# घंटागाडी गायब; शिवसेनेचे नगरसेवक उतरले थेट रस्त्यावर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : शहरातील अनेक भागांत घंटागाडी नियमित येत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. लेखी निवेदन आणि वारंवार विनंती करूनही समस्या कायम असल्याने अखेर शिवसेनेच्या नगरसेवकांनी स्वतः रस्त्यावर उतरून कचरा संकलन केले. लोकप्रतिनिधींनी थेट कृतीतून नागरिकांच्या समस्येकडे लक्ष वेधल्याने नगरपरिषदेच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरातील अनेक भागांत कचरा संकलन नियमित होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने नगरसेवक ॲड. सुशीलकुमार शिंदे, पांडूशेठ पोटे, अनिल महाराज औटी आणि नगरसेवक अख्तर भाई शेख यांचे चिरंजीव आतिफ शेख यांनी स्वतः कचरा संकलनाचा पुढाकार घेतला.

'नागरिकांची गैरसोय दूर करणे ही आमची जबाबदारी', अशी भूमिका घेत नगरसेवकांनी घंटागाडी न येणाऱ्या भागांतील नागरिकांना संपर्क साधण्याचे आवाहन केले. संबंधित भागात स्वतः येऊन कचरा संकलन करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नगरपरिषद प्रशासनाने शहरातील सर्व भागांत घंटागाडी नियमित सुरू करून नियोजित वेळापत्रकानुसार कचरा संकलन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. लोकप्रतिनिधींना स्वतः कचरा गोळा करण्याची वेळ येत असेल, तर शहरातील स्वच्छता व्यवस्थेची जबाबदारी असलेल्या यंत्रणेने आता तरी जागे व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. काम शब्दांपेक्षा मोठं असतं! शिवसेनेच्या नगरसेवकांचा कृतीतून संदेश.




# पिंटो ग्रंथालयात नवरात्रोत्सवात 'वाचनशक्तीचा जागर'

## उत्कृष्ट अभिप्रायासाठी मानाची पैठणी!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज** : नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून पाडळी आळे (ता. पारनेर) येथील पिंटो ग्रंथालयाच्या वतीने वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'वाचनशक्तीचा जागर' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत महिलांसाठी पुस्तक अभिप्राय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, उत्कृष्ट अभिप्राय देणाऱ्या महिलांना मानाच्या पैठणीसह विविध आकर्षक पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.

दि. ११ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत दररोज सकाळी ९ ते १० या वेळेत पिंटो ग्रंथालयात हा उपक्रम होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत नऊ वेगवेगळ्या वाडी-वस्त्यांवरील महिलांना सहभागी होण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. शक्तीच्या उपासनेसोबतच ज्ञानशक्ती आणि वाचनशक्तीचा जागर करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

स्पर्धेत महिलांना कथा, कादंबरी, आत्मचरित्र, वैचारिक साहित्य, इतिहास आदी कोणत्याही मराठी पुस्तकावरील आपला अभिप्राय मांडता येणार आहे. आदिशक्ती नवरात्रोत्सवाचा मान



आणि क्रांतीज्योत सावित्रीचा वाण म्हणून दोन मानाच्या पैठण्या देण्यात येणार आहेत. तसेच नऊ दिवसांत नऊ मानाच्या साड्यांचे वितरण करण्यात येणार आहे. या साड्यांचे सौजन्य पाडळी आळेच्या सरपंच कविता विकास डेरे, साधना अशोक डेरे आणि उज्ज्वला सुखदेव डेरे यांनी केले आहे.

साईराज कलेक्शन, आळकुटी आणि रश्मी सचिनशेठ साखला यांच्या वतीने नऊ चांदीच्या महालक्ष्मी मूर्ती देण्यात येणार आहेत. तसेच प्रथम पाच क्रमांक मिळविणाऱ्या महिलांना कै. दत्तात्रेय गावडे यांच्या स्मरणार्थ सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल. स्पर्धेदरम्यान हळदीकुंकू समारंभाचेही आयोजन करण्यात आले आहे. त्याचे सौजन्य रजनी उत्तम थोरात यांनी केले आहे.

सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. श्री संगमेश्वर महिला ग्राम संघ, विविध संस्थांतील महिला पदाधिकारी, पिंटो ग्रंथालय कार्यवाहक समिती आणि पाडळी आळे येथील महिला भगिनी या उपक्रमाचे संयोजन करीत आहेत.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## वांबोरी-खडांबा रोडवर अपघात महेश तोगे यांचे दुर्दैवी निधन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उंबरे :** वांबोरी येथील रहिवासी महेश भाऊराव तोगे (वय २८) यांचा तवेरा गाडी आणि मोटारसायकल यांच्यात झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. मुनोत पेट्रोल पंपा पासून २०० फूट अंतरावर्ती / जवळ वांबोरी-खडांबा रोडवर हा अपघात घडला. या दुर्दैवी घटनेत महेश भाऊराव तोगे यांना आपला जीव गमवावा लागल्याने वांबोरी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अवघ्या २८व्या वर्षी त्यांचे निधन झाल्याने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. महेश तोगे यांच्या अकाली निधनामुळे परिसरात शोककळा पसरली असून त्यांना सर्व स्तरांतून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# ग्रामीण शिक्षणाच्या प्रगतीचा गौरवशाली सन्मान

## डॉ. सुष्मिता विखे पाटील यांना पुरस्कार



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांना दिल्ली येथे 'शिक्षणरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

राष्ट्र सह्याद्री समूहाच्या वतीने प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्कारातून त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा आणि त्यांना उच्च शिक्षणासह विविध क्षेत्रांत प्रगती करण्याची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. शिक्षणाच्या बळावर ग्रामीण विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने प्रगती करावी आणि आपल्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवावे, यासाठी संस्थेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

शिक्षण हे ग्रामीण भागाच्या विकासाचे प्रभावी माध्यम असून, विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि आत्मविश्वास मिळणेही महत्त्वाचे आहे. या दृष्टिकोनातून प्रवरा शिक्षण संस्थेचे कार्य महत्त्वपूर्ण मानले जाते. संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत डॉ. सुस्मिता विखे पाटील यांचे योगदान असून, त्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत त्यांना 'शिक्षणरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्याला केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले, महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी विरोधी पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारी सचिव श्याम जाजू, दिल्ली येथील सुदर्शन न्यूजचे संस्थापक अध्यक्ष सुधीर चव्हाणके, अरुणनाथ गिरी महाराज, राष्ट्र सह्याद्रीचे करण नवले, पूनम नवले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. डॉ. सुस्मिता विखे पाटील यांना मिळालेल्या या सन्मानामुळे प्रवरा शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा गौरव झाला असून, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना राष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा मिळाली आहे.

## मळगंगा देवी मंदिरात नेवासा ज्योतीचे उत्साहात स्वागत; आज घटस्थापना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**निघोज :** राज्यातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या निघोज येथील मळगंगा देवी मंदिरात नेवासा येथून आलेल्या ज्योतीचे शनिवारी (दि. १०) सायंकाळी पाच वाजता भाविक रामदास लंके यांच्या हस्ते उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. रविवारी (दि. ११) सकाळी ११ वाजता मंदिरात घटस्थापना होणार असून, त्यानंतर नवरात्रोत्सवाला प्रारंभ होईल. नेवासा येथील मळगंगा देवीच्या भक्तांकडून गेल्या अनेक वर्षांपासून ज्योत घेऊन नेवासा ते निघोज अशी पायी वारी केली जाते. नवरात्रोत्सवानिमित्त मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट आणि ग्रामस्थांच्या वतीने दहा दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिर आणि परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. उत्सव काळात भजन, कीर्तन, प्रवचन आणि महाआरतीचे कार्यक्रम होणार आहेत. दररोज पहाटे पाच वाजता भाविक कुंडावर मळगंगा देवीचे तसेच देवीभोयरे येथील अंबिका देवीचे दर्शन घेण्यासाठी पायी जातात. दहा दिवसांत राज्याच्या विविध भागांतून सुमारे दोन लाख भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज आहे. पाचवी, सातवी आणि आठवी माळेला भाविकांची विशेष गर्दी होते. नवव्या माळेला होमहवनाचा धार्मिक विधी पार पडतो. दसऱ्याच्या दिवशी मळगंगा देवीच्या पालखीची छबिना मिरवणूक कुंडावर जाऊन पुन्हा निघोजमध्ये येते. यावेळी वराळ भावकीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. पालखी मिरवणुकीत वाद्यवृंद, लेझीम पथक, फटाक्यांची आतषबाजी आणि भंडाऱ्याची उधळण हे आकर्षण असते. मिरवणुकीनंतर सोने लुटीचा कार्यक्रम होतो. दरम्यान, एसटी बसस्थानक ते मळगंगा मंदिर परिसरात ज्ञानदेव लंके यांनी स्वखर्चाने एक लाख रुपये खर्च करून विद्युत रोषणाई केली आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## राहुरी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी हर्ष तनपुरे बिनविरोध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदाच्या रिक्त जागेवर हर्ष अरुण तनपुरे यांची बिनविरोध निवड झाली. दि. ९ ऑक्टोबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली.

माजी उपनगराध्यक्ष गजानन सातभाई यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर उपनगराध्यक्ष पदासाठी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत हर्ष तनपुरे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची शुक्रवार दिनांक ९ आक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या निवडीवर अधिकृत शिक्का मोर्तब करण्यात आले. या निवड प्रक्रियेवेळी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांच्यासह नगरसेवक प्रशांत डौले, प्रदीप भुजाडी, नंदू तनपुरे, सागर तनपुरे, सोन्याबापू जगधने, गजानन सातभाई, बबन गुलदगड, राहुल शेटे, केतन पोपळघट, प्रतीक तनपुरे, संगीता जाधव, लता जगधने, सूर्यकांत भुजाडी, संतोष उदावंत, अविनाश म्हस्के, आस्मा शेख, प्रियंका आहेर, बाळासाहेब उंडे, अरुण साळवे, नगरसेविका प्रसन्ना वराळे, प्रियंका काशीद यावेळी उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी किरण सावंत तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आणि नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विद्या पाटील, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, यांच्या उपस्थितीत निवडीची प्रक्रिया पार पडली. हर्ष तनपुरे यांच्या निवडीमुळे राहुरीत उत्साहाचे वातावरण असून त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

## अशोक कारखाना बंद करण्यासाठी सुपारी घेणाऱ्या लोकांवर विश्वास ठेऊ नका : मुरकुटे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव :** अशोक सहकारी साखर कारखाना हीआपल्या तालुक्यातील महत्वाची कामधेनू असुन ज्यांनी श्रीरामपूर सुतगिरणी, हरेगांव कारखाना,सह आपल्या तालुक्यातील अनेक सहकारी संस्था बंद पाडल्या अशा सुपारी बहाद्दरांना न जुमता आपली कामधेनू असलेला अशोक सहकारी साखर कारखान्याला ऊस पुरवठा करा असे भावनिक आवाहन अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी आ. भानुदास मुरकुटे यांनी मुठेवाडगांव येथील ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांच्या बैठकीत केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भागवत तांबे होते.

अशोकचे तज्ञ संचालक निरज मुरकुटे, रामभाऊ कासार, गणेश छल्लारे, कारेगांव भागाचे चेअरमन शिवाजी मुठे, सरपंच सागर मुठे, शिवाजी पवार हे मान्यवर उपस्थितीत होते. यावेळी मुरकुटे पुढे म्हणाले की अशोक कारखाना १९८७ साली तुम्हीच सभासदांनी आमच्या ताब्यात हा कारखाना दिला त्यावेळी प्रचंड ऊसाची अडचण असताना आम्ही पाणी अडवा पाणी जिरवा ही योजना राबवली आणि अशोकच्या कार्यक्षेत्रात उस पिकांचे क्षेत्र वाढून उत्पादन वाढले. मुठेवाडगांव चरावर, चारीलगत बंधाऱ्याची मालीका निर्माण केली आणि या परिसरात ऊस वाढला. आपल्याच तालुक्यातील काही सुपारी बहाद्दर लोकांनी कारेगांव येथे बैठक घेऊन अशोक कारखाना ऊस देऊ नका असे आवाहन केले. पण हा अशोक सहकारी साखर कारखाना तुमच्या मालकीचा आहे कारखाना जर बंद झाला तर परत चालू करणे सोपे नाही तुम्ही राहुरी कारखाना बंद झाला आहे तेथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विचारा काय हाल होतात म्हणून आपली कामधेनू असेलेला अशोक सहकारी साखर कारखान्याला ऊस घाला जिल्हातील इतर कारखान्यांना बरोबर भाव पण देऊ. मुरकुटे पुढे म्हणाले, या परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आम्ही सभासद केले. अशोक सहकारी कारखान्याचे संचालक केले, ज्यांची घरची परिस्थिती हालाखीची असताना आम्ही अशोक सहकारी साखर कारखानात नोकरी दिली असे विश्वासघात करणारे मला बघायला मिळाले.



ही माझ्या आयुष्यातील मोठी शोकांतिका असल्याचे मुरकुटे यांनी यावेळी कबूल केले. यावेळी सरपंच सागर मुठे,अँड दिलीप मुठे,अनिल पाचपिंड, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकीस सोसायटीचे माजी अध्यक्ष सुभाष मुठे, माजी पोलीस पाटील वसंत मुठे,, रमेश मुठे, गोकुळ मुठे, विनायक मुठे , तात्याभाऊ चौधरी, पाटीलबा मुठे,किशोर लोखंडे,सोपान मुठे, सुरेश मुठे, राजेंद्र चौधरी, उमेश उंडे,शेषराव मुठे, रामकिसन मुठे, सोन्याबापू मुठे, कैलास मुठे, नानासाहेब मुठे, काकासाहेब चौधरी,नामदेव मुठे, ज्ञानदेव मुठे,जालीदर मुठे, रामदास मुठे,लहानु मुठे, भाऊसाहेब मुठे, मल्हारी मुठे, गजानन मुठे,अमोल मुठे, कृष्णा मुठे, अशोक चौधरी, नानासाहेब चौधरी,बाळासाहेब भोंडगे, शशिकांत सावंत, किशोर साठे, शिवाजी रूपटक्के शिवाजी मुठे,राजु मुठे, विठ्ठल पाचपिंड,पुजांहरी शिंदे, साहेबराव मुठे, आबासाहेब घोडेचोर ,सह अनेक ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक कारखान्याचे माजी संचालक बबनराव मुठे यांनी केले तर शेवटी आभार सरपंच सागर मुठे यांनी मानले.

## पानोडीत घरफोडी; पावणे तीन लाखांची रोकड, पाच तोळे सोने लंपास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील पानोडी परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून पावणे तीन लाख रुपयांची रोकड आणि सुमारे पाच तोळे सोन्याचे दागिने असा लाखोंचा ऐवज लंपास केला. शुक्रवारी पहाटे ही घटना उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नवनाथ कारभारी पाबळ यांच्या घरातील देवघराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्यानंतर स्वयंपाकघरातील लोखंडी कपाट उचकटून त्यातील रोकड आणि सोन्याचे दागिने चोरून नेले. चोरीस गेलेल्या ऐवजात पावणे तीन लाख रुपयांची रोख रक्कम, तीन तोळ्यांचे सोन्याचे गंठण,



### ग्रामीण भागातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

ग्रामीण भागात दुष्काळ, अनियमित वीजपुरवठा आणि बिबट्याच्या दहशतीमुळे नागरिक आधीच त्रस्त आहेत. त्यातच घरफोडीच्या घटनेने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांचा बंदोबस्त करावा आणि चोरीचा मुद्देमाल हस्तगत करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

अंगठी, कानातील वेल आणि सोन्याची पोत अशा सुमारे पाच तोळे सोन्याच्या दागिन्यांचा समावेश आहे. या घटनेमुळे पाबळ कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

घरफोडीची माहिती मिळताच संगमनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक २१२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ) आणि ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## पोलीस ठाण्यासमोरील वहिवाटीचा रस्ता बंद; व्यावसायिक संतप्त!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** शहरातील पोलीस ठाणे आणि तहसील कार्यालयाकडे जाण्यासाठी पूर्वीपासून वापरात असलेला रस्ता बॅरिकेडिंग करून बंद करण्यात आल्याने नागरिकांसह व्यावसायिकांची मोठी गैरसोय होत आहे. शनी मारुती देवालय ट्रस्टच्या इमारतीच्या पूर्वेकडील गाळ्यांसमोरील हा रस्ता तातडीने खुला करावा, अशी मागणी परिसरातील व्यावसायिकांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे. प्रशासनाने रस्ता खुला न केल्यास उपोषण करण्याचा इशारा देण्यात आल्याने हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

श्रीगोंदा शहरातील शनी मारुती मंदिर परिसरातून पोलीस ठाणे तसेच पूर्वेकडील तहसील कार्यालयाकडे जाण्यासाठी डांबरी रस्ता अनेक वर्षांपासून वापरात आहे. या मार्गावरून परिसरातील व्यावसायिक, ग्राहक आणि शासकीय कार्यालयांत जाणारे नागरिक ये-जा करतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या रस्त्यावर बॅरिकेडिंग करून वाहतूक बंद करण्यात आली आहे. त्यामुळे पूर्वीपासून वापरात असलेल्या मार्गावर अडथळा निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.निवेदन देताना अ‍ॅड. जयंत शिंदे, गणेश काळे, हर्षवर्धन कळसकर, विकास काळे, अ‍ॅड. जी. बी. कडूसपाटील, नारायण क्षीरसागर, नितीन भागवत, गणेश जगताप, संकेत कुलकर्णी, संदीप दळवी, अ‍ॅड. जी. एम. औरंगे, अ‍ॅड. संग्राम चाकणे, नितीन कळसकर, मोहन जगताप, नीलेश गोरखे, सोमनाथ बोरुडे, प्रदीप भोसले आणि बाबासाहेब बळे उपस्थित होते.

आता तहसील प्रशासन या निवेदनाची दखल घेऊन रस्त्याचा प्रश्न मार्गी लावणार की व्यावसायिकांना उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्र सहयाद्री माध्यम समूहाचा सहयाद्री शिक्षण रत्न

## मरणोत्तर पुरस्कार साहेबराव घाडगे पाटील कुटुंबाकडे प्रदान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान या संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष साहेबराव घाडगे पाटील यांनी विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय, प्रेरणादायी व समाजाहिताच्या कार्याबद्दल दै. राष्ट्र सहयाद्री माध्यम समुह आणि महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने सहयाद्री शिक्षण रत्न हा मानाचा पुरस्कार हा घाडगे पाटील परिवाराकडे प्रदान करण्यात आला.

साहेबराव घाडगे पाटील हे रयत शिक्षण संस्थेच्या कमवा व शिका योजनेअंतर्गत शिक्षण घेतल्याची ओळख असल्याने स्व बॅरिस्टर पी. जी पाटील व प्राचार्या सुमतीताई पाटील यांचे विशेष आर्शिवाद व त्यांचेच प्रेरणेने ते उच्च पदावर पोहचले व त्रिमूर्ती सारखी शिक्षण संस्था उभी करून ग्रामीण भागातील गोरगरीब शेतक-याच्या, कष्टक-यांच्या पाल्यांना सर्व प्रकारची शिक्षणाची दालने सुरू केलेत,तसेच त्रिमूर्तीच्या माध्यमातून अहिल्यानगर,



अमरावती व वर्धा येथे एकंदरीत ४४ शाळा-महाविद्यालये स्थापीत करून हजारो लोकांना रोजगाराची निर्मिती केली.

नेवासा जवळील खडका येथील माळरानावर शासनाच्या पाणी अडवा पाणी जिरवा या योजनेला साद घालुन ३५-३५ एकर्सची दोन पाणी साठवण तलाव विद्यार्थी, स्टाफ व पालकांचे श्रमदानातुन साकार करून परिसरातील हजारो एकर शेतीचा पाणीप्रश्न मार्गी लावला. साहेबांनी हजारो फळबागाची लागवड करून वृक्षारोपण केलेले आहे. त्यांनी सामाजीक ,शैक्षणिक,सांस्कृतिक,औद्योगिक, क्रीडा,तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. त्यांचे शिक्षण क्षेत्रात खुप मोलाचे योगदान असुन सर्व प्रकारच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था निर्माण केलेली असून त्रिमूर्तीतून शिक्षण घेवुन बाहेर पडलेले हजारो विद्यार्थी उच्च पदावर आज कार्यरत आहेत.

दै. राष्ट्र सहयाद्री माध्यम समुहाचे प्रमुख काकासाहेब उर्फ करण नवले व कार्यकारी संपादिका पूनमताई नवले यांनी साहेबराव घाडगे पाटील यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना सहयाद्री शिक्षण रत्न हा मरणोत्तर पुरस्कार घोषीत केला होता. तो पुरस्कार नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात झालेल्या पुरस्कार सोहळयात केंद्रीय मंत्री रामदास आठवले व महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते साहेबराव घाडगे पाटील यांची कन्या त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा स्नेहलताई घाडगे-चव्हाण पाटील व चेतन चव्हाण पाटील यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला.